# शब्द रुची

जून २०१३ • मूल्य १० रुपये

## डॉ. नरेंद्र जाधव यांच्या समग्र अभिव्यक्तीचा 'लसावि' मांडणारे आणि 'आमचा बाप आन् आम्ही' पुस्तकाची १६१ वी आवृत्ती या दोन पुस्तकांचे प्रकाशन




डॉ. नरेंद्र जाधव लिखित 'लसावि – माझ्या समग्र अभिव्यक्तीचा' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी वसुंधरा जाधव, डॉ. विजय केळकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. नरेंद्र जाधव आणि डॉ. मिलिंद भोई

## नाशिक येथे 'माझं साहित्यिक खटलं' पुस्तकाचे प्रकाशन




ॲड. यशवंत हडप लिखित 'माझं साहित्यिक खटलं' पुस्तक प्रकाशनसमयी उषा मेहता, ॲड. राजेंद्र पै, रामदास भटकळ आणि नंदकिशोर भुतडा

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

जून २०१३, वर्ष १
अंक दुसरा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : अरुण जोशी
मुखपृष्ठ : ग्रंथाली संगणक विभाग
शब्द रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

स.न.वि.वि.

सचिनने आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली. द्रविडही म्हणतो माझी ही शेवटची आयपीएल आहे. काही जणांनी खेळाबाबत आपली वृत्ती दाखवली आणि आयुष्याचा खेळखंडोबा केला. बेटिंगमधून जास्त माया जमवण्याच्या हव्यासामुळे खेळून येणारी 'श्री'ही 'शांत' झाली. हाच मोठा चर्चेचा विषय आणि महत्त्वाचा प्रश्न उरला होता. त्याचे समाधान झाले. बाकी राज्य दुष्काळविरहित होणार असे मुख्यमंत्र्यांनी सांगितलेच आहे. नेट सेटच्या प्राध्यापकांनी नेटाने सेट केलेली प्रश्नपत्रिका सोडवताना सरकारच्या नाकी नऊ आले तरी शिक्षणाचे आलबेल असणार आहे. पावसाच्या तोंडावर राहुल गांधी दुष्काळग्रस्तांना भेटले तेव्हा त्यांचेही प्रश्न आपसूक मार्गी लागतील. नक्षलवाद पुन्हा पुन्हा बळी घेतोय त्याकडे सरकारचे लक्ष आहे. स्पॉट फिक्सिंगमध्ये अडकलेल्या खेळाडूला लग्नासाठी जामीन द्यायचा का, संजय दत्तला किती काळ घरचे जेवण द्यायचे हे प्रश्न कोर्ट सोडवत आहे. मग प्रश्न उरतात कुठे?

हे सगळे पाहताना उबग येतो आणि आपण चॅनेल बदलत राहतो. मग एखाद्या चॅनेलवर काही चांगले, उद्बोधक, निखळ रंजक वाटले तर स्थिरावतो. असाच स्थिरावण्याचा चॅनल आहे 'शब्द रुची'. या अंकात प्रभाकर वाईरकर, भाऊसाहेब चासकर, अपर्णा पाटील, डॉ. माधवी मेंहेदळे, श्रीपाल सबनीस आणि रविराज गंधे यांचे लेख आहेत. आपल्याला ते वाचत पुढे जावेसे वाटेल.

पुढला अंक जुलै–ऑगस्ट जोड अंक असेल. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या बोस्टन येथील अधिवेशनानिमित्त हा विशेषांक 'गोष्ट ग्लोबल लग्नाची' हा विषय घेऊन येत आहे.

**– कार्यकारी संपादक**



प्रभाकर वाईरकर




# मनस्वी : मंगेश तेंडुलकर

**प्रभाकर वाईरकर,** व्यंगचित्रकार

कलेच्या क्षेत्रात पाय ठेवणारी प्रत्येक व्यक्ती प्रथमत: स्वत:ला व्यक्त करण्यासाठी व नंतर जगासमोर व्यक्त होण्यासाठी, त्यात नैपुण्य साध्य करण्यासाठी कलासागरात पहिली डुबकी मारते. मग ती कोणतीही कला असो. गायक 'दीप' राग आळवून स्वत:मध्ये दीपोत्सव साजरा करत त्या प्रकाशामध्ये सभोवतालचे जग लखलखीत करत असतो. मल्हार रागाच्या तानांमधून जीवनात कधीही दुष्काळाचे सावट पडू नये म्हणून पावसाच्या सरीवर सरी कोसळवत असतो. नर्तक आपल्यातील ऊर्जेतून, पदलालित्यातून, मुद्रेतून जीवन नादमय, तालमय करण्यासाठी धडपडत असतो. चित्रकार विधात्याने केलेल्या नवरंगांच्या उधळणीत स्वत:ला झोकून देऊन, जीवन रंगमय करून, पर्यायाने इतरांचे जीवन रंगवत असतो.

मात्र एखादा कलाकार आपल्या कलेचा उपयोग दुसऱ्याच्या जीवनात आनंद फुलवण्यासाठी न करता, त्याला जास्तीत जास्त मानसिक त्रास, चिडचिड निर्माण व्हावी या हेतूने करण्यासाठी कलेकडे खेचला जातो, यावर विश्वासही बसणार नाही वा असा कलाकार असू शकतो हे सहज पटणार नाही. पण हे सत्य आहे. हा कलाकार आहे व्यंगचित्रकार. जात्याच खोडकर, कुरापती काढणे हा त्याचा एकमेव छंद. मग लहान वा मोठी किंवा म्हातारी व्यक्ती असली तरीही भेदभाव नाही. सगळ्यांच्या कुरापती काढणे हेच उद्दिष्ट. त्यासाठी व्यंगचित्रांचा वापर ही



नामी कल्पना अमलात आणली गेली. व्यंगचित्रकलेची पायाभरणी केली गेली. अशा या वल्लीचे नाव मंगेश तेंडुलकर – प्रसिद्ध व्यंगचित्रकार.

शाळकरी असल्यापासून व्यंग-चित्रकलेची आवड. इतर अभ्यासातील 'प्रावीण्या'ची गणती खालच्या नंबरापासून सुरू व्हायची. वडील धोंडोपंत हे अकाउंटंट होते. आईवडिलांचा व शिक्षकांचाही विरोध, तरी व्यंगचित्रे काढायची खुमखुमी काही औरच. पुण्याच्या भावे स्कूलचा अकरावीपर्यंत दरवर्षी चित्रकलेमध्ये नापास होणारा बहुधा एकच विद्यार्थी. परंतु घरातच एक भाऊ चित्रकलेमध्ये अनेक पुरस्कार मिळवत होता. चित्रकलेच्या परीक्षा देत होता. त्याने त्याकाळी कार्ल मार्क्सचा प्लॅस्टर ऑफ पॅरिसमध्ये पुतळाही तयार केला होता. त्याचे नाव प्रसिद्ध साहित्यिक, नाटककार, पद्मभूषण विजय तेंडुलकर. मोठा भाऊ रघुनाथ महाराष्ट्राच्या अर्थमंत्रालयात अंडर सेक्रेटरी, धाकटा भाऊ बँकेच्या डायरेक्टर पदावर आणि बहीण आदर्श शिक्षिका. अशी ही गुणवंत भावंडे मंगेश तेंडुलकरांमध्ये आपणही काहीतरी भरीव करावे यासाठी ऊर्जा निर्माण करत होती.

विजय तेंडुलकरांच्या चित्रकलेच्या छंदाने प्रभावित होऊन त्यांच्या वडिलांनी त्यांना पुण्याच्या इंटरनॅशनल बुक हाऊसमधून चित्रकला या विषयावरची काही इंपोर्टेड पुस्तके कौतुकाने आणून दिली. थोड्याच कालावधीत कविता व कथा यांच्या प्रेमात विजय तेंडुलकर पडले व त्या दिशेने त्यांची वाटचाल सुरू झाली. त्यामुळे धूळ खात पडलेल्या त्या चित्रकलेच्या पुस्तकांमधील 'कार्टुनिंग फॉर एव्हरीबडी' हे फ्रेंच व्यंगचित्रकाराचे पुस्तक मंगेश यांच्या हाती पडले आणि कुरापतखोर स्वभावाला त्यातील व्यंगचित्रांनी, आपण लहान-थोरांच्या कळी-कुरापती काढून ते प्रक्षुब्ध झाले की आनंद साजरा करावयाचा अशा उपद्रवी स्वभावाला आणखी मोठ्या प्रमाणात कुरापती काढू असा आत्मविश्वास दिला. तेथेच व्यंगचित्र माध्यमाशी मंगेश यांची गट्टी जमली.

चित्रकलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण नाही वा मार्गदर्शनही नाही. अशा अवस्थेत केवळ व्यंगचित्रकलेचाच ध्यास. पोहोण्यासाठी पहिली उडी पाण्यात मारल्यावर जशा गंटागळ्या खाव्या लागतात त्याप्रमाणे अपमान, हेटाळणी, तुच्छता वगैरे सर्वमान्य







‘सामाजिक दान’ त्यांच्याही पदरात आले. तरीही व्यंगचित्रकलेला कसा चिकटून राहिलो याचे उत्तर मंगेशजी आपल्याकडे नाही असे म्हणतात. त्यांचे पहिले व्यंगचित्र १९५४ साली प्रसिद्ध झाले. एसएससी पास होऊन पुढे काय करावे या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी म्हणून घरापासून जवळच असलेल्या पुण्याच्या अभिनव कला-महाविद्यालयात शिक्षण घेण्याच्या उद्देशाने ते तेथे गेले. परंतु ‘‘व्यंगचित्रकला ही कला आहे असे आम्ही मानत नाही, तुझ्या हातात चित्रकला असेल तर व्यंगचित्र चितारून तुझा हात ‘खराब’ करून घेऊ नकोस’’ असा सल्ला मिळाला. घरातून व शिक्षकांकडून व्यंगचित्रकलेला विरोध असल्याने नाइलाजाने बीएस्सीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. नको असलेल्या नोकरीच्या चक्रव्यूहातून पंचवीस (उमेदीच्या) वर्षांनी बाहेर पडले १९९६ मध्ये. त्यावेळी संपूर्ण वेळ नोकरी करताना उरलेल्या वेळात व उरलेल्या प्राणानिशी व्यंगचित्रे चितारण्याचे काम चालू होते. तरीही ती व्यंगचित्रे स्वैर व कुणाला तरी बदडण्याची, आशय वा विषयांचे वावडे असलेली, भान नसलेली असायची. परंतु अनेकांची व्यंगचित्रे पाहून हळूहळू पाय जमिनीवर लागले. त्यामध्ये फ्रेंच व्यंगचित्रकार लॅरिए यांचा उल्लेख ते अभिमानाने करतात. ही खडकाळ वाट त्यांनी स्वत:च्या मोडक्यातोडक्या प्रयत्नांनी साफ केली. त्यासाठी कोणा बुलडोझरचा (गॉडफादर) आधार घेतला नाही. त्यांनी अनेक विषयांवर व्यंगचित्रे चितारली, सामाजिक भान ठेवलेली. त्यामध्ये स्त्रियांचे प्रश्न, बेशिस्त वाहतूक, भ्रष्टाचार, लाचारी, प्रेम आणि स्वत:वर केलेली व्यंगचित्रे यांचा उल्लेख करावाच लागेल. त्यामानाने राजकीय व्यंगचित्रे कमी केलेली आहेत.

त्यांच्या व्यंगचित्र-कलेच्या स्टाइलचा ऊहापोह करताना, त्यांनी जो ब्रशचा वापर लीलया केला आहे, तो डोळ्यांना सुखावतो. जाड-बारीक रेषांचा उपयोग ते परस्पेक्टिव्ह, घनता, शॅडोज् दाखवण्यासाठी अगदी सराईतपणे करतात. एखाद्या नर्तकीने आपल्या पदन्यासाने भावचित्र निर्माण करावे तसे.

आपण हे जग सोडून गेल्यावर पृथ्वीतलावर आपली अवस्था कशी असेल हे अतिशय मार्मिकपणे कुत्र्याच्या कृतीवरून ‘कै. मी.’ या व्यंगचित्रातून व्यक्त केले आहे.





सिम्प्लीसिटी - कमीत कमी रेषा व रंग हा त्यांच्या व्यंगचित्रांचा अविभाज्य भाग आहे.

जंगलतोड थांबवण्यासाठी कुऱ्हाडीलाच कशी पालवी फुटते याचे उत्कृष्ट चित्रण पाणी शिंपणारी मुलगी व कुऱ्हाड यामध्ये दिसून येते व त्यांच्या सृजनशीलतेची खोली किती आहे याची जाणीव यामधून दिसून येते.

ट्रॅफिक या विषयावर त्यांची अनेक व्यंगचित्रे, पोस्टर्स प्रसिद्ध आहेत. हमरस्त्यावर थांबू नये हा संदेश देताना, गाडी बिघडली तरीही ती पाठीवर घेऊन गॅरेजमध्ये जावे या अतिशयोक्तीचा वापर त्यांनी अतिशय चपखलपणे केला आहे. विडंबन, फॅन्टसी आणि उपहास हा त्यांच्या व्यंगचित्रांचा स्थायीभाव आहे.

'व्यंगचित्र चांगले झाले आहे' अशी स्तुती दीनानाथ दलाल यांनी केली याचे त्यांना फार अप्रूप आहे. (आंतरराष्ट्रीय पर्यटन वर्ष विषयक 'दीपावली'च्या दिवाळी अंकात ते प्रसिद्ध झाले होते.) अनेक वर्तमानपत्रे व नियतकालिकांतून त्यांची मोठी व्यंगचित्रे व पॉकेट कार्टून्स प्रसिद्ध झालेली आहेत. सामना, ऐक्य, महाराष्ट्र हेराल्ड या दैनिकांसाठी तर आवाज, जत्रा, माहेर अशा अनेक अंकांतून त्यांची असंख्य चित्रे प्रसिद्ध झाली आहेत.

व्यंगचित्रे साकारताना त्यांचे अनेकांशी संबंध बिघडले. काहींशी कायमचे. त्यांनी अनेकांची कॅरिकेचर्स काढली आहेत. एकदा एका ज्येष्ठ प्रेक्षकाचे कॅरिकेचर चितारले. ते गृहस्थ खवळून म्हणाले, ''तुझ्या बापाच्या वयाचा माणूस मी, तुला मी सापडलो व्यंगचित्रासाठी?'' त्यावर संयोजकांनी क्षमायाचना केली. ''क्षमा मागण्यासारखे काही नाही, गायकाला 'वाहवा' मिळते. नटाला टाळ्या मिळतात तशी व्यंगचित्र चितारण्याला खरी आणि उत्स्फूर्त दाद 'अशी' मिळते. त्या गृहस्थांचा कृतज्ञ आहे'' हे उत्तर तेंडुलकरांनी त्यांना दिले. तेंडुलकर हे हजरजबाबी, सडेतोड व्यक्त होणारे, कोकणी माणसारखे तिरकस पण फणसासारखे व्यक्तिमत्त्व असणारे असामी आहेत. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी पावसजवळचे 'भडे'.

तेंडुलकर म्हणतात, ''पंचावन्न/साठ वर्षांपूर्वी मी महत्त्वाकांक्षेच्या पाठीमागे पळत होतो. त्यावेळी चांगले काम होत नव्हते. पण आज मी कुणी 'होण्याची' निकड संपली तेव्हापासून माझ्याकडून मनासारखे काम होऊ लागले.'' स्वत:ला ते व्यंगचित्रकार म्हणायला तयार नाहीत. ते म्हणतात, ''लाल रंगाच्या खुळखुळ्या-बरोबर अर्भक जसे खेळते तसा मी हातात सापडलेल्या माध्यमाशी खेळत बसलो. शुद्ध खेळ करत बसलो, ते आपटून, चेचून, वाकवून, चावून त्याचे काय काय करता येते हे पाहण्यात माझी करमणूक झाली.''

'कार्टूनिस्ट कंबाईन' या व्यंगचित्रकारांच्या संघटनेचे ते १९९४/९५ काळात अध्यक्ष होते. त्यांची ४०च्यावर एकल प्रदर्शने झाली आहेत. समाजविघातक प्रवृत्ती विरोधात ते भर चौकात पत्रकेही वाटतात. ते उत्कृष्ट लेखक व विचारवंत वक्ते आहेत. कोणत्याही गोष्टीचा त्यांचा निषेध अगदी तीव्र व मनस्वी असतो.

आज ७७व्या वर्षीही त्यांचा उत्साह पंचविशीच्या तरुणाला लाजवेल असा आहे. ते प्रदर्शनांच्या निमित्ताने पत्नीसोबत गोव्यापर्यंत स्वत: गाडी ड्राइव्ह करून जातात आणि त्याच ईर्ष्येने व्यंगचित्रकलेच्याही कारचा आनंद उपभोगताहेत. त्यांची प्रिय पत्नी स्नेहलता, कन्या, तिची दोन मुले, मुलगा, सून, जावई एकत्र राहतात.

त्यांची 'कार्टून्स', 'तेंडुलकरी स्ट्रोक्स', 'अन्सिन रियालिटी' ही तीन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

त्यांच्या व्यंगचित्रांच्या सफरीला 'मुंबई मराठी पत्रकार संघा'ने पुरस्कार देऊन सलाम ठोकला आहे.

तेंडुलकर म्हणतात, ''सुरुवातीला जग, माणसं, मन-भावना यावर व्यंगचित्रे करता करता आता स्वत:पासून अलग होऊन स्वत:कडे आणि आसमंताकडे पाहता येण्याची वेगळीच मौज माझ्या व्यंगचित्रातून व्यक्त होताना आयुष्याची ७७ वर्षे क्षणार्धात दिव्याचा स्विच बंद करावा तशी ऑफ झाली, या उपद्व्यापात...!

**- प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# प्रादेशिक विकासाच्या असमतोलातून निर्माण झालेल्या राष्ट्रीय शोकांतिकेचे विवेकी चिंतन !

डॉ. श्रीपाल सबनीस

'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केलेले डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे 'वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र? एका वादाची सद्यस्थिती' हे पुस्तक जानेवारी, २०१३ मध्ये प्रसिद्ध झाले. लेखक श्रीपाद भालचंद्र जोशी हे विदर्भात जन्मलेले, वाढलेले कवी, लेखक विचारवंत असले तरी वेगळ्या व स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला त्यांचा साधार विरोध असल्याचे जाणवते. याचा अर्थ सध्याच्या उपेक्षित, अन्यायग्रस्त, भळभळत्या जखमा अंगा-खांद्यावर घेऊन जगणाऱ्या विदर्भाशी या लेखकाला देणेघेणे नाही का? जरूर आहे. विदर्भाची माती, तेथील माणसे, निसर्ग, प्राचीन संस्कृती, कला, साहित्य, राजकारण, समाजकारण, आदिवासी, कामगार, दलित, उपेक्षित या सर्वांचा आणि श्रीपाद भालचंद्र जोशींचा अतूट अनुबंध जुळलेला आहे. या अर्थपूर्ण सांस्कृतिक अनुबंधाच्या अधिष्ठानावरच या वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकाची निर्मिती झाली आहे. वेगळ्या विदर्भाचा प्रश्न सुमारे ११० वर्षांपासून गाजतो आहे. त्यावर असंख्य पुस्तिका, लेख, विशेषांक प्रकाशितही झालेत. पण सर्व बाजू लक्षात घेऊन, सर्वांच्या भूमिकांचा सप्रमाण अभ्यास नोंदवून विदर्भाच्या न्यायासाठी लिहिले गेलेले याशिवाय दुसरे पुस्तक माझ्या वाचण्यात-ऐकण्यात नाही !

विदर्भाला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता मिळावी या भूमिकेला ११० वर्षांचा मोठा इतिहास आहे आणि अखंड महाराष्ट्रच राहिला पाहिजे या भूमिकेला मात्र सुमारे ५५ वर्षांचा इतिहास आहे. इतिहासाच्या लांबीवर भूमिकांचे मूल्य ठरवले जाऊ नये ! लेखक श्रीपाद भालचंद्र जोशींची यापैकी भूमिका कोणती? पुस्तकाधारे उत्तर द्यायचे तर त्यांची भूमिका तिसरीच आहे आणि ती स्वतंत्र आहे. १९० पानांच्या पुस्तकात डॉ. श्रीपाद जोशींनी विदर्भाच्या प्राचीन इतिहासासह आधुनिक व समकालीन समाज-राजकीय इतिहासही या पुस्तकात मांडला आहे. अर्थात वेगळ्या विदर्भाच्या फुटीर मागणी संदर्भातील आणि अखंड महाराष्ट्राच्या समर्थनासंदर्भातील आवश्यक ठरलेला संपूर्ण तपशील पुराव्यासह त्यानी प्रतिपादन केला आहे. त्याशिवाय त्यांच्या स्वत:च्या स्वतंत्र भूमिकेला त्यांना मांडता आले नसते. त्यासाठी श्रीपाद भालचंद्र जोशीनी प्रचंड परिश्रम घेतल्याचे दिसते. विदर्भाच्या या प्रश्नावरील ११० वर्षांतील विविध राजकारणी नेते, विद्वान, लेखक यांचे लेख, भाषणे, पुस्तिका मिळवून, त्यांची संगती लावून श्रीपाद जोशींनी त्यावर अर्थपूर्ण भाष्य केले आहे.

या निमित्ताने 'छोटी राज्ये' व 'मोठी राज्ये' यांच्या संबंधाने विचारमंथनही घडले आहे. राज्य पुनर्रचना आयोग, फाजल अली आयोग, दांडेकर समिती, वैधानिक विकास मंडळे, दार कमिशन, राज्य घटनेच्या तरतुदी अशा मूलभूत दस्तऐवजांच्या साक्षी, विवेचनाच्या ओघात नोंदल्या गेल्यामुळे या पुस्तकाचे संशोधनमूल्यही वाढले आहे.

संयुक्त महाराष्ट्रातून विदर्भ वेगळा काढून त्याचे स्वतंत्र राज्य व्हावे या मागणीसाठी सध्या अधूनमधून लाटा उठतात. पण या मागणीला व्यापक चळवळींचा जनाधार नसल्याची नोंद त्यांनी केली आहे. तरीही या फुटीरतावादी मागणीची कारण-मीमांसा गांभीर्याने समजून घ्यायला हवी.

विदर्भाच्या स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी संशोधन व लेखन करणारे डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांच्या प्रामाणिक हेतू व प्रयत्नांबद्दल ग्रंथलेखकासह कोणत्याही सुबुद्ध वाचकाला आदरच वाटतो. विदर्भातील नक्षलवाद संपवण्याच्या दृष्टीने आणि पश्चिम महाराष्ट्राच्या शोषण प्रक्रियेतून विदर्भाची मुक्ती करून सर्वांना समान न्याय देण्यासाठी विदर्भाच्या स्वतंत्र राज्याची निर्मितीच हवी असा ध्यास श्रीनिवास खांदेवाले रुजवतात. पण डॉ. श्रीकांत जिचकार यांच्यासारखा विचारवंत नेता मात्र अखंड महाराष्ट्रवादी भूमिका मांडताना अभ्यासपूर्ण संशोधन समोर ठेवून वेगळा विदर्भ मागणीला विरोध करताना दिसतो. जिचकारांनी या संदर्भात दिलेली आकडेवारी थक्क करणारी आहे.

स्वतंत्र विदर्भ राज्य झाल्यास संपूर्ण उत्पन्न राज्याच्या प्रशासन, पेन्शनवरच खर्च होईल. रोजगारासाठी व नव्या योजना राबवण्यासाठी निधी शिल्लक नसेल. नवे राज्य कर्जबाजारी होऊन सुमारे ३००० कोटींची तूट निर्माण होईल. स्वतंत्र राज्य आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण असणार नसल्याचा स्पष्ट निर्वाळा श्रीकांत जिचकार देतात. त्याचा प्रतिवाद श्रीनिवास खांदेवाले यांनी केला आहे. पण तरीही जिचकारांच्या मांडणीतला गाभा अनुत्तरीत राहतो. कारण खांदेवाले यांच्या म्हणण्यानुसार विदर्भातील वनसंपत्ती, कच्चा माल, खनिज, मत्स्योद्योग, कापूस, रेशीम किड्याचे उत्पादन याला अनुकूल हवामान; हे

सर्व असले तरी या सर्वांचा उपयोग स्वतंत्र विदर्भातील राजकीय नेते करून घेण्याइतपत दूरदृष्टीचे व सच्चे राहतीलच याची शाश्वती कुणी द्यावी? शिवाय स्वतंत्र विदर्भाची मागणी ही जनतेची नसून ती मूठभर सत्तालोलुप नेत्यांची व मोजक्या श्रीमंतभांडवलदारांची असल्याचे सत्य विदर्भातीलच विद्वानांनी नोंदले आहे.

डॉ. वि.स. जोगांसारख्या विद्वानाने या संदर्भात आपले मत स्पष्टपणे नोंदवताना म्हटले की, मूठभर असंतुष्ट पुढारी, विघ्नसंतोषी भांडवलदार आणि आकडेवारीवर चालणारे मोजके अर्थतज्ज्ञ यांचीच स्वतंत्र राज्याची मागणी आहे. अर्थात प्रा. डॉ. जोग यांचा स्वतंत्र विदर्भ राज्याला विरोध असला तरी त्यांना पश्चिम महाराष्ट्राने विदर्भाला 'मांडलिक' समजून सतत उपेक्षा करणे मुळीच मान्य नाही. संयुक्त महाराष्ट्रात विदर्भाला समान न्याय हवा आहे. प्रा. राम शेवाळकरांसारख्या प्रसिद्ध साहित्यिकाची भूमिकाही संयुक्त महाराष्ट्राच्याच बाजूने राहिली. तेव्हा श्रीकांत जिचकार, शेवाळकर, डॉ. जोग या मान्यवरांना संयुक्त महाराष्ट्रच हवा असला तरी विदर्भाला मिळणारी सापत्न वागणूक मात्र मान्य नाही. शिवाय छोट्या राज्यातील अस्थिरतेचा धोका दृष्टिआड करता येत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या २८८ आमदारांतही 'सत्ताखेळा'त खरेदी-विक्रीचा बाजार रंगतो. तर स्वतंत्र विदर्भाच्या छोटच्या राज्यातील ६६ आमदारांच्या सत्तास्पर्धेत १५-२० आमदार हाताशी धरून बाजार मांडण्याची शक्यता कुणी व कशी नाकारावी?

मोठ्या राज्यातील सधन-संपन्न भागाच्या उत्पन्नाचा लाभ छोट्या छोट्या विभागांना देता येतो. छोट्या स्वतंत्र राज्यात संपूर्ण खर्च केवळ शासनाच्या प्रशासनावर होतो. म्हणून विदर्भाच्या स्वतंत्र राज्याची मागणी करणारे मूठभर हितसंबंधी यांचा हेतू तपासला पाहिजे. स्वतंत्र राज्यात विकास कुणाचा होणार? आदिवासी-मजूर-शेतकरी यांच्या विकासाची हमी स्वतंत्र विदर्भाचे कैवारी घेणार का? अशा मूलभूत प्रश्नांची उकल या पुस्तकात करण्यात आली आहे. श्रीकांत जिचकार यांची श्वेतपत्रिका आणि त्यांच्या आकडेवारीने भक्कम बनलेले संशोधन या पुस्तकात निर्णायक महत्त्वाचे ठरले आहे. स्वतंत्र विदर्भ राज्य अव्यवहार्य आणि आर्थिक दृष्ट्या तोट्याचे असल्याचे सत्य जिचकार मांडतात. त्याची यथार्थ पाठराखण लेखकाने केली आहे.

विद्यमान 'मिहान' प्रकल्प हा नागपूर केंद्री प्रस्ताव असून केवळ नागपूरचा विकास म्हणजे विदर्भ विकास मानता येणार नसल्याची नोंद महत्त्वाची आहे. गोवा, छत्तीसगड, झारखंडसारखी नवी छोटी राज्ये राजकारण्यांच्या सोईसाठी निर्माण केली गेली आहेत. पण त्यांचा विकास अपेक्षेप्रमाणे झालेला नाही. शिवाय तेथील सरकारे सतत अस्थिर राहिल्याने जनतेच्या सुखाचा व विकासाचा अजेंडा अपूर्णच असल्याचा निर्वाळा श्रीपाद जोशींनी दिला आहे. छोट्या राज्यात मुख्यमंत्री आणि त्यांचे सत्ताधारी राजकारणी या मूठभर राज्यकर्त्यांचीच चंगळ होते. बाकी जनता विकासापासून वंचित राहते. शिवाय कमी भांडवल गुंतवून अधिक नफा मिळवण्याचा खेळ सत्ताधारी व भांडवलदारांच्या संगनमतातून छोट्या राज्यात अधिक मोठा होत असतो याची प्रचितीही स्पष्ट करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर आमदारांच्या खरेदीसाठी कमी गुंतवणूक करून अधिक नफा मिळवण्यासाठीच वेगळ्या विदर्भाचे राज्य मागण्याचा प्रकार राजकीय दलाल करीत असल्याचा गंभीर आरोप या मांडणीत केला गेलेला आहे. पण या मागणीला जनतेचा पाठिंबा मात्र मुळीच नसल्याचाही निर्वाळा दिला आहे. रत्नाकर महाजन यांच्या 'विदर्भाचे मृगजळ' या पुस्तिकेतील भूमिकेचीही यथार्थ मांडणी श्रीपाद जोशींनी आपल्या विवेचनात केली आहे. व्यापक राजकीय व सामाजिक उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवण्याऐवजी विसंगत मागण्या पुढे आणून विकासाला खीळ बसवायचा प्रकार रत्नाकर महाजनांनी अयोग्य मानलाय. तसेच राष्ट्रीय ऐक्याऐवजी धार्मिक ऐक्यावर घसरणाऱ्या मागण्या धोकादायक असल्याचेही त्यांनी मांडले आहे.

छोट्या राज्यांच्या निर्मिती संदर्भातील विविध मान्यवरांच्या भूमिकांचा तपशील स्वीकारताना श्रीपाद जोशींनी सी.डी. देशमुखांचे चिंतनसूत्रही मांडले आहे. १९५६ मध्ये सी.डी. म्हणाले होते की, भविष्यकाळात छोटी राज्ये होतील. पण त्यात साधन-सामुग्री नसेल ! मोठ्या राज्यातील संपन्न भूभाग आणि इतर भागात आदान-प्रदान होईल व विकास शक्य होईल.

सुलभा ब्रह्मे यांच्या भूमिकेची साक्ष समजून घेताना, मुद्दा स्वतंत्र विदर्भाचा नव्हे तर लोककेंद्री विकासाचा असल्याचे सत्य पटू लागते. शिवाय स्वतंत्र विदर्भाची मागणी ही मोजके राजकारणी व थैलीशहांच्या हितसंबंधातून पुढे आल्याचे सुलभा ब्रम्हे मांडतात. विकासाचा निधी जनतेपर्यंत पोचत नाही. कारण शासनच जनहितविरोधी आहे तेव्हा श्रमिकांच्या एकजुटीचा दबाव शासनावर आणून विकास साध्य करावा हेच महत्त्वाचे ठरते.

धनंजय गाडगीळांनी सुद्धा विकास हा मुंबईकेंद्रीत नसावा तर तो महाराष्ट्राच्या सर्व विभागांचा असावा अशी नोंद केल्याची साक्ष लेखकाने मांडली आहे. संयुक्त महाराष्ट्रात उच्चवर्णीय नेत्यांना स्थान नसल्यामुळेच स्वतंत्र विदर्भाची मागणी पुढे आल्याचे मत डॉ. आंबेडकरांनी १९४८ मध्येच व्यक्त केले होते. अर्थात या मागणीला जनतेचा पाठिंबा नसल्याचे त्यांनी सांगितले होते. पण १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी आपली भूमिका बदलल्याची सुलभा ब्रह्मे यांनी केलेली नोंद श्रीपाद भालचंद्र जोशींनी केली आहे.

विदर्भाचे स्वतंत्र राज्य मागणारी मंडळी उपेक्षा सहन न झाल्याने, ''हुतात्मे संयुक्त महाराष्ट्रासाठी झाले. आमचा त्यांच्याशी काय संबंध?'' असा प्रश्न विचारतात. पण स्वतंत्र राज्याची मागणी ही जनतेऐवजी सावकारी दलालच करीत असतील व त्यांच्याच पैशांनी चळवळीच्या लाटा उठत असतील तर स्वतंत्र विदर्भ राज्याचे शिल्पकार केवळ भांडवलदारच ठरतील आणि मग नवे विदर्भ राज्य आदिवासींना-शेतकऱ्यांना न्याय कसा देईल,

हा प्रश्न शिल्लक राहतो. शोषण प्रक्रिया व उपेक्षा तशीच राहणार असेल तर मूठभर राजकारण्यांच्या व भांडवलशहांच्या विकासासाठी वेगळ्या विदर्भाची जनतेला गरज काय? याच कारणासाठी स्वतंत्र राज्याच्या मागणीला विदर्भाच्या तळातील जनतेने कधीच पाठिंबा दिलेला नाही.

१९०२ मध्ये हैदराबादच्या निजामाने ब्रिटिशांना विदर्भ प्रांत कराराने देऊन आपल्या सैन्यासाठी दर वर्षासाठी २५ लाख खर्चाची तरतूद केली. त्यानंतर मराठी भाषेच्या मुद्यावर आणि सांस्कृतिक संचिताच्या कैवारातून स्वतंत्र विदर्भाची मागणी सातत्याने करण्यात आली. लोकनायक अणे, ब्रिजलाल बियाणी अशा अनेक मान्यवरांनी आपल्या निष्ठा या संदर्भात पणाला लावल्या. फाजल अली आयोगाने स्वतंत्र विदर्भ, उर्वरित महाराष्ट्र आणि मुंबई केंद्रशासित अशी विभागणी करून शिफारस केली. पण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला कलावंत, शेतकरी, मजूर, सर्व राजकीय पक्षांचे नेते यांच्या सहमतीने उधाण आले. विदर्भातूनही भरघोस पाठिंबा मिळाला. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळ यशस्वी झाली. लोकनायक अणे यांची आचार्य अत्रे यांनी मुलाखत घेतली, त्यांनी 'मी संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध नसल्याचे' सांगितले होते. १९५६ साली मुंबईच्या संयुक्त महाराष्ट्र अधिवेशनात मध्यप्रदेश, वऱ्हाड, नागपूर यामधील मराठी भाषिकांसह सर्व प्रदेश संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीत असावा, असा ठराव मंजूर केला गेला आणि विदर्भाचे नेते रामराव देशमुख त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. त्यामुळे १९३८ ची स्वतंत्र विदर्भ प्रांताची मागणी संयुक्त महाराष्ट्राच्या नव्या मागणीत विलीन झाली. महाविदर्भाची मागणीही त्याच क्षणाला विलय पावली. पण संयुक्त महाराष्ट्राची मागणी केवळ भाषिक नसून ती समाजवादी अर्थव्यवस्थेची पहिली पायरी असल्याचे कॉ. डांगे यांनी म्हटले होते. संयुक्त महाराष्ट्र मिळाला, पण तो घडणार कसा? व घडवणार कोण? हा कॉ. डांग्यांचा प्रश्न आजही महत्त्वाचा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचे नवे मॉडेल कोणते? लाभार्थी कोण? विकास कुणाचा? या प्रश्नांच्या दिशेने चिंतन आवश्यक ठरते.

विदर्भाच्या ज्वलंत प्रश्नावर विवेचन करताना श्रीपाद भालचंद्र जोशींनी अभिव्यक्त केलेली वैचारिकता, त्यांच्या प्रगल्भ व्यक्तित्वाची, डोळस अभ्यासाची आणि विदर्भासह एकूणच महाराष्ट्राच्या विकसित संस्कृतीनिष्ठेची साक्ष देते.

संयुक्त महाराष्ट्राच्या अनेक परिषदा भरवण्यात रामराव देशमुख, पंजाबराव देशमुख, केशवराव जेधे, पटवर्धन, खापर्डे या नेत्यांचा सहभाग होता. अकोला करार आणि नंतरचा नागपूर करार हे स्वतंत्र विदर्भाच्या मागणी संदर्भातील महत्त्वाचे टप्पे आहेत. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करताना एक गुप्त करारही झाला होता. संयुक्त महाराष्ट्र लांबणीवर पडला तर पुन्हा स्वतंत्र विदर्भ चळवळीला पाठिंबा दिला जावा. अर्थात विदर्भातील सर्व जुने नेते जनतेच्या विकासासाठी कटिबद्ध होते. संयुक्त महाराष्ट्रात सामील होताना नागपूर करारानुसार विदर्भ-मराठवाड्याला समान समतोल विकासाची हमी नोंदली होती. पण पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांनी विदर्भाचा निधी पळवून शोषण केले. राज्यपालांच्या आदेशाला व घटनात्मक तरतुदीनुसार निर्माण झालेल्या वैधानिक विकास मंडळाला बाजूला ठेवून निधी लाटला. अनुशेष वाढत गेला. शेतकऱ्यांनी आत्महत्या करून विदर्भ बेचिराख झाला. पण त्यांची दया-माया करण्याची, घटनात्मक कर्तव्य बजावण्याची बुद्धी राज्यकर्त्यांना सुचलीच नाही. परिणामी विदर्भाचा विश्वासघात झाल्याची भावना वाढीस लागली. विदर्भाचे प्राचीनत्व रामायण काळापर्यंत भिडते. विदर्भकन्या रुक्मिणीचा लौकिक जनतेच्या मनामनात रुजलाय. विदर्भाने अनेक श्रेष्ठ कलावंत, साहित्यिक, राजकीय नेते महाराष्ट्राला दिले. पण विदर्भाच्या वाट्याला संयुक्त महाराष्ट्रात सर्वार्थाने उपेक्षाच आली.

विदर्भाच्या चंद्रपूर जिल्ह्यात वीज निर्मितीचे प्रकल्प प्रस्थापित केले. औष्णिक प्रकल्पांच्या उभारणीमुळे पर्यावरण दूषित झाले. विदर्भ गॅस चेंबर बनला आणि त्याच्या विजेवर पश्चिम महाराष्ट्रातील उद्योगधंदे खुलून बहरले. एका कृषी विद्यापीठाशिवाय विदर्भाला नवीन रोजगाराच्या संधीचे कोणतेही नवे प्रकल्प मिळाले नाहीत. विदर्भ नेते त्यांच्या वरिष्ठांसमोर नांगी टाकतात. विदर्भाचे नेतृत्व दुबळे आणि पश्चिम महाराष्ट्राचे नेते प्रबळ! त्यामुळे विदर्भाचे मागासलेपण वाढत गेले. जलसिंचनाच्या योजना रखडवल्या गेल्या. पश्चिम महाराष्ट्र मात्र विदर्भाच्याच पळवलेल्या निधीवर हिरवा झाला. नागपूर करार पायदळी तुडवून विदर्भ उद्ध्वस्त झाला. आदिवासी आणि दलितांच्या वेदनांची कथा गडद झाली. नक्षलवाद वाढला. पण राज्यघटनेत नमूद असलेल्या समान समतोल विकास करण्याच्या तत्त्वाचा महाराष्ट्राच्या नेतृत्वाला विसर पडला. परिणामी अर्थव्यवस्था मोडकळीस येऊन वैदर्भी शेतकऱ्यांच्या आत्महत्या हजारोच्या संख्येने वाढल्या. 'वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र' अशा वांझोट्या वादात वृत्तपत्रे आणि राजकीय नेते रमून गेले. पण खऱ्याखुऱ्या विदर्भ विकासाचे मॉडेल पुढे आणले गेले नाही. वैदर्भी भांडवलदारांनी विदर्भात उद्योग न काढता मुंबई-पुण्याला कारखाने उभारले. विदर्भाचे जंगल, पाणी, खनिज, वनसंपत्ती यांचा गैरवापर, शोषण आणि उपेक्षा करून येथील जनतेची नागवणूक केली गेली. विदर्भातल्या कलावंताना-लेखक-कवींना विश्वासात न घेता संयुक्त महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण आखले गेले. विदर्भातील प्रतिभावंतांची उर्वरित महाराष्ट्राने सतत उपेक्षा केली. या सांस्कृतिक शोकांतिकेचा श्रीपाद भालचंद्र जोशी प्रणित आलेख अत्यंत हृदयस्पर्शीच आहे.

या पार्श्वभूमीवर श्रीपाद जोशी स्वतंत्र विदर्भ राज्याच्या बाजूचे नाहीत हे स्पष्ट होते. पण ते निखळ अखंड महाराष्ट्राच्या बाजूचे आहेत काय? या प्रश्नाच्या उत्तरात फार मोठा तपशील द्यावा लागेल. विदर्भातील सामान्य माणसाच्या विकासाच्या समतोल न्यायाच्या अटीवर श्रीपाद भालचंद्र जोशी अखंड महाराष्ट्राच्या कैवारात उभे असल्याचे चित्र आहे. हीच त्यांची तिसरी भूमिका आहे आणि या भूमिकेचे स्वागत कोणताही सुबुद्ध नागरिक

सहज करू शकतो.

स्वतंत्र विदर्भाच्या मागणीच्या ११० वर्षांच्या इतिहासात प्रारंभीचे ब्रिटिश व नंतरचे कॉंग्रेस सरकार विदर्भाला कधीही अनुकूल नसण्याची नोंद अर्थपूर्ण आहे. विदर्भात बहुसंख्य जनता मराठी भाषा बोलणारी असूनही स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी 'विदर्भ बनाओ वादा निभाओ' अशी हिन्दी घोषणा दिली जाते. यामधील विरोधाभास श्रीपाद जोशींनी सूक्ष्म चिंतनातून व्यक्त केलाय.

विदर्भ आणि संयुक्त महाराष्ट्राचे सांस्कृतिक ऐक्य एवढ्या वर्षानंतरही अद्याप पूर्णत: झालेले नसल्याचे निरीक्षण लेखकाने नोंदले आहे. स्वतंत्र विदर्भ पुढाऱ्यांचा असून, ते राज्य लोकांचे नव्हे! स्वतंत्र विदर्भाच्या चळवळीत लेखक-कलावंत नाहीत आणि त्यांचा विश्वासही संपादन केला जात नाही. पुढाऱ्यांना स्वतंत्र विदर्भ हवा, जनतेला मात्र विकास हवा! या नोंदी अस्वस्थ करतात.

प्रांतिक आणि भाषिक राष्ट्रवाद प्रबळ झाल्यास राष्ट्राच्या ऐक्याला धोका होईल असा इशारा डॉ. आंबेडकरांनी दिला होता, अशी असंख्य महत्त्वाची चिंतनसूत्रे व सूक्ष्मपणे केलेल्या निरीक्षणांच्या नोंदी सहजपणे श्रीपाद जोशींच्या विवेचनात आढळतात.

१९४७ साली प्रथमत: पं. नेहरूंनी भाषिक प्रांत संकल्पनेला मान्यता दिली. घटनेच्या मसुदा समितीने स्वतंत्र आयोग नेमला. राज्यपुनर्रचनेच्या अधिष्ठानात केवळ एकमेव भषिक आधार कधीच नव्हता तर प्रशासकीय, आर्थिक आधारही मांडले गेले. कॉंग्रेसने १९५१ साली राज्यपुनर्रचनेचा आधार 'लोकेच्छा' असल्याचे घोषित केले. आयोगाच्या दृष्टीने भाषिक जनतेचे रूपांतर सांप्रदायिकतेच्या कट्टरपणात होऊन राष्ट्रभावनेला भाषिक प्रांताचा अडथळा निर्माण होतो. अशा अनेक अर्थपूर्ण नोंदींमुळे या अभ्यासाचे मूल्य श्रेष्ठ ठरले आहे.

मागच्या काळात 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना निर्णायक मानली जात होती. पण आता राज्याचा व कल्याणकारी ध्येयवादाचा संबंधच उरला नसल्याने नवीन राज्याची निर्मिती सर्वसामान्याच्या विकासाची बांधिलकी मान्य करणार नाही. विदर्भाच्या शोषणाला विदर्भाचे नेतृत्व जबाबदार असल्याचा आरोप करीत राहण्यात फारसा पुरुषार्थ नसून संपूर्ण संयुक्त महाराष्ट्राची उभारणीच समाजवादी कल्याणकारी ध्येयवादावर करण्यासाठी उर्वरीत महाराष्ट्रानेच दबाव निर्माण करणे गरजेचे आहे, अशी श्रीपाद भालचंद्र जोशींची मागणी व मांडणी आहे.

स्वतंत्र विदर्भाच्या मागणीला जनतेचा आधार नसल्याचे सत्य श्रीपाद जोशी यांनी वारंवार सप्रमाण नोंदवले आहे. पण ''जनतेच्या चळवळीतून स्वतंत्र्य राज्यांची मागणी आली तर तिला विरोध करण्याचे कारण नाही'', असेही मत त्यांनी दिले आहे. याचा अर्थ एवढाच आहे, की जर संयुक्त महाराष्ट्राने विदर्भावरचा अन्याय व शोषण थांबवले नाही तर मात्र तळ ढवळून निघेल. जनता कधीतरी पेटून उठेल आणि मग जनतेचीच चळवळ वाढली तर मात्र अखंड महाराष्ट्राचा जप करण्यात अर्थ नाही. अशा वेळी लेखक स्वत: त्या चळवळीचे स्वागत करण्यास सज्ज राहतील. अर्थात ही भूमिका स्वाभाविक व समर्थनीयच आहे.


श्रीपाद भालचंद्र जोशींची प्रगल्भता आणि त्यांचा प्रामाणिकपणा समजून घेण्याची गरज आहे. लोकनायक अणे, ब्रिजलाल बियाणी आणि जांबुवंतराव धोटे यांच्या लोकप्रियतेची व विश्वासार्ह नेतृत्वाची भलावण करून श्रीपाद भालचंद्र जोशींनी विदर्भाच्या सांस्कृतिक संचितांचा वेळोवेळी योग्य गौरव केला. लहानातल्या लहान लेखांची-प्रयत्नांची नोंद घेऊन त्यांनी विदर्भावर प्रेम करणाऱ्या सर्व भूमिकांचा समतोल परामर्श घेतलाय. वैधानिक विकास मंडळाचे मधुकरराव किंमतकर, शंकरराव गेडाम, श्रीकांत जिचकार, आनंदराव कळमकर, वसंत रायपूरकर, डॉ. वि.स. जोग, प्रमोद भागवत, बापूजी अणे, ब्रिजलाल बियाणी, जांबुवंतराव धोटे आदी सर्वांच्या भूमिकांचे सामर्थ्य लेखकाने समर्थपणे आकळले आहे. तेलंगणा व विदर्भाच्या स्वतंत्र राज्याच्या चळवळीचा तुलनात्मक अभ्यास करून वस्तुनिष्ठ निष्कर्षही लेखकाने स्पष्टपणे नोंदले आहेत. चेन्ना रेड्डीएवढे सामर्थ्य चंद्रशेखर रावमध्ये किंवा त्यांच्या सहकाऱ्यात नसण्याने तेलंगणा चळवळीला जनतेचा आधार नसल्याचे सत्य लेखक सांगतात.

या सर्व पार्श्वभूमीवर 'विदर्भ विकास आघाडी' उभारून सर्व पक्षीय किंवा निष्पक्ष विदर्भप्रेमींच्या दबावगटातून विदर्भाच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. त्यात लेखक-कलावंत-पत्रकारांचा विश्वास संपादन करून त्यांना लाचार न करता सन्मानाने या प्रक्रियेत सामावून घ्यावे. आजपर्यंत कलावंत-लेखकांनी आपापले योगदान माडखोलकरांपासून खुद्द या ग्रंथ लेखकांपर्यंत दिलेले आहेच. पण स्वार्थांध राजकारण्यांच्या दावणीला बांधून घेण्याची लाचारी लेखक-कलावंत स्वीकारणार नाहीत. अर्थात त्यांचे सच्चे प्रेम विदर्भावर आहेच.

विशिष्ट प्रदेशात राहणाऱ्या ८७ टक्के लोकांना सुस्थितीत आणून जातिनिर्मूलनासह सर्व प्रकारच्या शोषणाचा अंत करणाऱ्या व भूमीपूत्रांच्या मानवी हक्काची हमी देणाऱ्या राज्याची निर्मिती राज्यपुनर्रचनेतून मिळायला हवी. ती हमी सध्याचा संयुक्त महाराष्ट्र देत नाही, म्हणून हा ११० वर्षांचा वैदर्भीय विकासाचा प्रश्न ज्वलंत बनलाय. सर्वांच्या समग्र विकासाचा ध्येयवाद पूर्ण करण्याची हमी मिळवण्याची भूमिका श्रीपाद भालचंद्र जोशींनी विदर्भाच्या निमित्ताने मांडली आहे. पण ती एवढ्याच प्रादेशिक भूगोलापुरती मर्यादित नाही! संपूर्ण देशातील सर्वच मागास प्रदेशांच्या जनतेच्या उत्थानासाठी समतोल विकासाची गरज असल्याचे सत्य लक्षात घ्यावे लागते आणि त्यासाठी केंद्र शासनाचे समतोल समन्यायी नियोजनही आवश्यक असल्याचे सत्य याच मांडणीतून पुढे येते.

या व्यापक परिप्रेक्ष्याला राष्ट्रीय मूल्यभान आणि प्रादेशिक विकासाचा समन्यायी अनुबंध स्पष्ट व सिद्ध करणाऱ्या या तिसऱ्या भूमिकेच्या ग्रंथाचे स्वागत व गौरव करणे माझेही कर्तव्यच आहे!

**- डॉ. श्रीपाल सबनीस**
गणराज बी अपार्टमेंट, पाचवा मजला,
नारायण पेठ पोलिस चौकीसमोर, पुणे
भ्रमणध्वनी : ९४२२३६९५२०



रविराज गंधे



# वाचनसंस्कृती एक दृष्टिक्षेप

**रविराज गंधे**

अलीकडे साहित्य-कला आदी विविध विषयांमधील किंवा क्षेत्रातील झालेल्या प्रगतीचा अथवा अधोगतीचा आढावा घ्यायचा झाला तर लेखक-पत्रकार-समीक्षक मंडळी आपापल्या लिखाणात किंवा भाषणात 'संस्कृती' ह्या शब्दाचा आवर्जून उल्लेख करतात. कलासंस्कृती, साहित्यसंस्कृती, उद्योगसंस्कृती, जलसंस्कृती असा शब्द वापरून आपण त्या त्या श्रेत्राचा परामर्श घेतो. गेल्या अनेक शतकांमध्ये भारतात आणि जगभर अनेकविध प्रकारच्या संस्कृती उदयाला आल्या, बहरल्या आणि नामशेष झाल्या. त्या त्या काळातील संस्कृती या त्या काळातील समाजाच्या अस्तित्वाची-अस्मितेची-अभिमानाची खूण म्हणून गौरवल्या गेल्या. त्यातील काही संस्कृतींचा आजही आपल्याला अभिमान आहे.

सतराव्या शतकाच्या सुमारास युरोपात 'रेनेसान्स'चं युग अवतरलं. त्या काळात साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला आदी अनेकविध कलाक्षेत्रांत जागतिक कीर्तीच्या सर्वोत्तम कलाकृतींचा जन्म झाला. शेक्सपीअर, लिओनार्दो द विंची, मायकेलॲन्जेलो, बीथोव्हेन, मोझार्ट इत्यादी प्रतिभावान मंडळींच्या कलाकृती आजही अजरामर आहेत. आपल्याकडेही बाराव्या शतकापासूनच्या इतिहासाची अधिकृत नोंद आहे. ह्यामध्ये ज्ञानेश्वर, तुकाराम, संत रामदास अशा संतमहात्म्याचं वैचारिक-आध्यात्मिक योगदान महत्त्वपूर्ण ठरलं. काळाच्या कसोटीवर उतरलं. संगीत-साहित्य-नाटक आदी क्षेत्रांत त्या त्या शतकांमध्ये सुंदर अभिजात कलानिर्मिती झाली. संगीत नाटकांचा बहरीचा काळ हे त्याचं एक उदाहरण. एखाद्या कलेचा मोठ्या समाजावर दीर्घकालीन पडलेला प्रभाव मात्र अभावानंच आढळला. महाराष्ट्रात शास्त्रीय संगीत गाणारे प्रतिभावंत गायक होऊन गेले. आजही आहेत. परंतु संगीतसंस्कृती निर्माण होऊ शकली नाही. एकेकाळी लखनौमधला पानवाला अन् टांगेवाला देखील गझल-शेरोशायरी करताना दिसे. कलानिर्मिती जेव्हा तळागाळातल्या सर्वसामान्य माणसापर्यंत रुजते, त्याला भावते तेव्हा ती खऱ्या अर्थानं त्या काळातील संस्कृती म्हणून ओळखली जाते. अशा संस्कृतीच्या खुणा धूसर व्हायला लागल्या, नाहीशा व्हायला लागल्या की आपण अस्वस्थ होतो. अंर्तमुख होतो. कारण संस्कृती हाच माणसाचा श्वास आहे.

खरं म्हणजे महाराष्ट्राला आपली स्वत:ची अशी वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती आहे का? महाराष्ट्रात शास्त्रीय संगीत आणलं ते उत्तरेकडच्या विविध घराण्यातल्या दिग्गज गायकांनी! सर्वाधिक पुजले जाणारे देव विठोबा-खंडोबा हे कर्नाटक आणि दक्षिणेतून आलेले. आपली खाद्यसंस्कृती अन् वेशभूषा वैशिष्ट्यपूर्ण नाही. खाद्यपदार्थांवर तर दक्षिणेतील राज्यांचा आणि मुगल संस्कृतीचा मोठा पगडा आहे. कुठलीही संस्कृती मुळात रुजायला एक परंपरा आणि व्यापक जनाधार लागतो. वास्तविक महाराष्ट्राला प्रतिभावान सिद्धहस्त लेखक-कवींची मोठी सोनेरी ऐतिहासिक परंपरा आणि पार्श्वभूमी आहे. परंतु वाचनसंस्कृतीचा मात्र दुर्दैवानं म्हणावा तसा व्यापक प्रसार झाला नाही. असं का व्हावं याचा सांस्कृतिक पातळीवर अनेक वेळा शोध घेण्याचे प्रयत्न झाले. ते पहाणं उद्‌बोधक होऊ शकेल.

पुण्याच्या एका भाषाविषयक कार्य करणाऱ्या संस्थेनं या संदर्भात एक निरीक्षण प्रसिद्ध केलं. या संस्थेच्या पाहणीनुसार महाराष्ट्रात सर्व प्रकारचं साहित्य वाचणाऱ्या साहित्यप्रेमी वाचकांनी संख्या ही चार लाखांच्या घरात असल्याचं आढळलं. तर हौशी नवोदित-व्यावसायिक किंवा छंद म्हणून साहित्य लेखन करणाऱ्यांची संख्या ही जेमतेम १ लाखाच्या घरात असल्याचं दिसलं. पुस्तक वाचण्यापेक्षा रोजचं वर्तमानपत्र वाचणाऱ्यांची संख्या अर्थातच लक्षणीय अशी एकूण लोकसंख्येच्या १० टक्के एवढी आढळली. यावरून एकूणच वाचनसंस्कृतीचा परीघ मर्यादित असल्याचं स्पष्ट होतं. आता जी काही रसिक-वाचकमंडळी पुस्तकं वाचतात ती काय अन् कशा प्रकारचं वाचन करतात हे पाहणं मनोरंजक ठरेल. सर्वसाधारण वाचकवर्गात सुहास शिरवळकर, व.पु. काळे, माधवी कुंटे, योगिनी जोगळेकर, ज्योत्स्ना

देवधर, शैलजा राजे, गुरुनाथ सामंत आदी लेखकमंडळी लोकप्रिय असल्याचं वाचनालयांमधील पुस्तकांच्या मागणीवरून दिसतं. लोकलमधल्या आणि विविध कार्यालयांत काम करणाऱ्या महिलावर्गाच्या हातांत ही पुस्तकं दिसतात. त्या खालोखाल गदिमा, पुल आदी लेखकांचा मोठा चाहतावर्ग आहे. भालचंद्र नेमाडे, जी.ए. कुलकर्णी, श्री.ना. पेंडसे यांच्या साहित्यकृती तुलनेने मोठ्या वाचकवर्गाकडून वाचल्या जातात. मेघना पेठे, मोनिका गजेंद्रगडकर, अरुणा ढेरे, जयंत पवार, नीरजा आदी नवीन पिढीतील लेखकमंडळींना विशिष्ट वाचकवर्ग आहे. अर्थातच तो मर्यादित आहे. तरुण पिढीला पुस्तकांमधून आगळंवेगळं, लार्जर दॅन लाइफ, खिळवून ठेवणारं वाचायला आवडतं. 'स्वामी महानायक', 'पानिपत', 'ययाति', 'एक होता कार्व्हर', 'अग्निपंख' अशी पुस्तकं तरुणमंडळींमध्ये लोकप्रिय असल्याचं दिसतं. कुसुमाग्रजांच्या-पाडगावकरांच्या प्रेमकविता तरुणांना खूप आवडतात. थोरामोठ्यांच्या चरित्र-आत्मचरित्रांना मोठी मागणी असते. 'श्यामची आई' हे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर वाचलं गेलेलं सर्वाधिक खपाचं पुस्तक आहे. संमेलनांमधून कथा-कादंबऱ्या कवितासंग्रहांपेक्षा उपयुक्ततावादी पुस्तकं मोठ्या प्रमाणावर विकली जातात. योगाभ्यास, पाककृती, थोरामोठ्यांची चरित्रं, आहार-विहारावरील पुस्तकं, पर्यटनविषयक पुस्तकं इत्यादींना मोठी मागणी असते. या विक्रीनं अर्थातच साहित्यप्रसार होतो असं म्हणता येत नाही किंवा वाचकांना वाचनाची खूप गोडी आहे असा निष्कर्ष काढता येत नाही.

एकूणच सर्वसाधारण मराठी वाचकवर्गाचं अवलोकन करताना नव्या दमाच्या, आगळंवेगळं दर्जेदार साहित्य लिहिणाऱ्या लेखक-कवींचा मराठी साहित्यातील नवनव्या साहित्यप्रवाहांचा फारसा परिचय वाचकांना नसल्याचं जाणवतं. जुन्या पिढीतील वाचकवर्गाच्या तुलनेत ह्या मंडळींचा वाचक कमी आहे. साहित्याची जाण असणाऱ्या जागरूक वाचक-मंडळींकडून नवीन लेखकांना चांगला प्रतिसाद मिळतो ही समाधानाची बाब आहे. खऱ्या अर्थानं वाचक चळवळ महाराष्ट्रात रुजवायची असेल, तिला अपडेट करायची असेल तर पुल-गदिमा, फडके-खांडेकर इत्यादी साठ-सत्तरच्या दशकातील लेखक-कवींच्या साहित्यकृतींमध्ये रममाण झालेल्या वाचकांना साहित्यिक 'नॉस्टेल्जिआ'मधून बाहेर काढणं गरजेचं आहे. दिवंगत दिग्गज प्रतिभावान साहित्यिकांच्या जन्मदिन अथवा पुण्यतिथीनिमित्त साजऱ्या केल्या जाणाऱ्या स्मरणरंजनाबरोबर नव्या पिढीच्या साहित्यांचीही वाचकवर्गासमोर नोंद व्हायला हवी. कौतुक व्हायला हवं. त्यासाठी सर्वसाधारण वाचकवर्गाची साहित्यविषयक जाण आणि साक्षरता वाढवणं, त्याच्यात रसिकवृत्ती फुलवणं गरजेचं आहे. अशा प्रकारे जागरूक वाचक तयार करण्याचं हे अभिसरण झालं नाही तर वाचनसंस्कृतीचा प्रसार आणि मराठी साहित्याचा विकास होणं अवघड होऊन जाईल. जीवनशैलीतील अनेक बदल आपण आनंदानं-अभिमानानं आपलेसे केले. सकस दर्जेदार साहित्यनिर्मिती करणाऱ्या नवनवीन लेखक-कवींचं साहित्य मोठ्या प्रमाणावर वाचलं जाण्याची गरज आहे. अन्यथा उत्तम प्रतीच्या साहित्यनिर्मितीबाबत भविष्यात साहित्यिकांच्या मानदंडाचं मोजमाप करताना साठ-सत्तरच्या दशकांतील लेखक-कवींचाच उल्लेख करावा लागेल. कारण आता पूर्वीच्या लेखकांसारखे 'सुप्रसिद्ध' वगैरे कोणी नवीन लेखक-कवी फारसे होणार नाहीत.

वाचनसंस्कृतीचा विचार करताना आणखी एक गोष्ट लक्षात येते ती अशी, की महाराष्ट्रातल्या जनतेला आज जी काही थोडीफार वाचनाची-साहित्याची गोडी लागली आहे त्यात नामवंत मंचीय कवी-लेखकांचा मोठा वाटा आहे. ह्या मंडळींनी महाराष्ट्रभर दौरे करून कथा-कविता वाचनाचे कार्यक्रम करून साहित्याचा मोठा प्रसार केला. परंतु ह्या मंडळींनी फक्त स्वत:च्या कथा-कवितांचे कार्यक्रम केल्यानं, जे लेखक-कवी मंचीय कार्यक्रम करत नाहीत किंवा ज्यांना ती कला अवगत नाही त्यांच्या साहित्याची ओळख लोकांना फारशी झाली नाही. द.मा. मिरासदार, शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथाकथनाचे कार्यक्रम खूप लोकप्रिय होते. नारायण सुर्वे, ना.धों. महानोर, वसंत बापट आदी मंडळींना सामान्य 'माणूस' त्यांच्या 'कवितावाचना'च्या कार्यक्रमामुळे साहित्यिक म्हणून ओळखू लागला. मंगेश पाडगांवकरांच्या लोकप्रियतेमध्ये श्रीनिवास खळे-यशवंत देव आदी संगीतकारांच्या संगीतरचनांचा मोठा वाटा आहे. आपल्याकडे एखाद्या लेखकाच्या कादंबरीवर एखादा सिनेमा किंवा नाटक आलं की तो एकदम प्रकाशात येतो. तुमच्या कवितांची गाणी झाली अन् हिट झाली की तुम्ही प्रसिद्ध होता. पु.ल. देशपांडे हे सर्वसामान्यांमध्ये लेखकापेक्षा परफॉर्मर म्हणून लोकप्रिय होते. सर्वसामान्य माणसाच्या साहित्य आणि साहित्यिकांकडे एक करमणूक म्हणून पाहण्याच्या मानसिकतेमुळे-दृष्टिकोनामुळे जागरूक चौफेर वाचकवर्ग तयार होण्यास अडचण होते. अलीकडे सुमार दर्जाच्या पुस्तकांचे नामवंत लेखक-कवींच्या उपस्थितीमध्ये दणक्यात प्रकाशन समारंभ होतात. वर्तमानपत्रात त्या पुस्तकांतील प्रकरणंही छापून येतात. ह्या प्रसिद्धीप्रक्रियेतून लेखकाला आपण मोठे लेखक झाल्याचं क्षणिक समाधान मिळतं अन् वाचकांची दिशाभूल होते. एखाद्या लेखकाचं पुस्तक गाजण्यासाठी त्यावर एक तर वाद निर्माण व्हावा लागतो किंवा त्याला एखादा पुरस्कार मिळावा लागतो किंवा तो मिळालेला पुरस्कार कसा मॅनेज केलेला आणि अपात्री आहे हे कोणीतरी पुरवणीतून लिहावं लागतं. अशा साहित्यबाह्यवृत्तीमुळे वाचनसंस्कृतीला योग्य वळण मिळत नाही. सर्वसामान्य वाचकाला वाचनप्रक्रियेसाठी दिशादर्शन होत नाही. विंदा करंदीकरांच्या 'अष्टदर्शने' ह्या पुस्तकाच्या प्रकाशित झाल्यानंतर दहा-बारा

वर्षांच्या काळात फक्त हजारेक प्रती विकल्या गेल्या. २००० साली पुस्तकाला 'ज्ञानपीठ पुरस्कार' मिळाल्यानंतर वर्षभरात आठ हजार प्रती विकल्या गेल्या. एखादा साहित्यिक मोठा आहे हे पुरस्कार मिळाल्यावरच लोकांना जाणवतं का? आपल्याकडे एक मोठा सुशिक्षित पांढरपेशा सुखासीन उच्च मध्यमवर्ग आहे. तो स्वत:ला सांस्कृतिकदृष्ट्या सतत अपडेट करत असतो. त्यातून त्याला त्याच्या चौफेर रसिकतेचं प्रदर्शन करायचं असतं. अशा मंडळींचा साक्षेपी वाचनापेक्षा बुकशेल्फ सजवणाऱ्यावर जास्त भर असतो.

वाचनसंस्कृतीची पाळंमुळं खोलवर न रुजण्याचं एक महत्त्वाचं कारण म्हणजे तरुण पिढीसह आजच्या सर्वच लोकांची स्पर्धात्मक जगातली जीवनशैली ही अतिशय व्यग्र, तणावपूर्ण आणि संघर्षमय असणं हे आहे. त्यांच्या भावनिक अवकाशामध्ये ऐहिक सुख-संपन्नतेला नितांत महत्त्व आणि प्राधान्य आहे. त्यासाठी आजचा माणूस दिवस-रात्र झगडत असतो. पैसा मिळवणं आणि समाजात आली इमेज तयार करणं ह्या दोनच गोष्टी आजच्या समाजापुढे आहेत असं वाटतं. वाचनासाठी आवश्यक असा निवांतपणा आणि मानसिक उसंत अन् शक्ती त्याच्यापाशी उरली नाही. अर्थात ह्या पार्श्वभूमीवर अनेक लोक चांगलं नवं वाचण्याच्या ऊर्मीतून वेळात वेळ काढून पुस्तकं वाचतात हे खरं. परंतु त्याचं प्रमाण खूपच अल्प आहे.

छोटी-मोठी साहित्यसंमेलनं, साहित्यविषयक उपक्रम, ग्रंथप्रदर्शनं, आचार्य अत्रे कट्ट्यासारखे उपक्रम, फिरती वाचनालयं, व्याख्यानमाला, सांस्कृतिक गप्पागोष्टी अशा अनेकविध गोष्टींमधून साहित्याचा जरूर प्रसार होतो. ही चळवळ व्यापक आणि झंझावाती होणं गरजेचं आहे. लोक पुस्तकांच्या दुकानात किंवा वाचनालयात येत नसतील तर पुस्तकांना त्यांच्या घरी पोचलं पाहिजे. प्रकाशक-लेखकांनी देखील खपतात म्हणून उपयुक्ततावादी पुस्तकांच्या निर्मितीमागे लागू नये. त्यानं साहित्यविश्वाचं मोठंच नुकसान होत आहे. पुस्तकं वाचकांच्या घरी पोचल्यावर ती त्याला वाचावीशी वाटतील अशी कुतूहलजनक आणि आश्चर्यकारक कशी निर्माण होतील याचा गंभीर विचार होण्याची आज नितांत गरज आहे. आजच्या काळात पुस्तक हे एक प्रॉडक्ट आहे. त्याचा दर्जा आणि सौंदर्य सांभाळून ते लोकांपर्यंत पोचवलं तर नक्कीच लोकप्रिय होईल. कुणी सांगावं महाराष्ट्रातही अमेरिकेसारखी लाखांनी विकल्या जाणाऱ्या बेस्ट सेलर पुस्तकांची संस्कृती रुजू शकेल. मग प्रकाशकांना देखील सुमार लेखकांच्या टुकार पुस्तकांची 'वर्षभरात पंधरावी आवृत्ती' अशी जाहिरात करण्याची वेळ येणार नाही. पुस्तकं हा आजच्या मराठी माणसाच्या जीवनशैलीचा भाग बनवणं हेच सर्वात मोठं वाचनसंस्कृतीपुढील आव्हान आणि वास्तव आहे.

**– रविराज गंधे**
५८/८ बसंतस्मृती, पांडुरंगवाडी,
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com




मूल्य २२५ रु.
सवलतीत १३५ रु.
टपाल खर्च ३० रु

# घडत गेलेली गोष्ट

## विजया राजाध्यक्ष

''तुमचं काय चाललंय मॅडम? लेखन वगैरे...''

''विशेष काही नाही गं. बघू काही सुचलं तर. ते आपल्या हातात थोडंच असतं? काहीतरी सापडतं अचानक! पण ते जरी लिहिलं तरी वाटतं, अजून काहीतरी उरलं आहे. मी त्याच्यापर्यंत पोहोचू शकत नाही... एका अर्थानं ते बरंच असतं म्हणा! जाऊ दे, उगाच काहीतरी बोलत बसले.''

कॉफी घेता घेता सुजाता म्हणाली,

''मॅडम, तुम्ही एक कथा लिहीत होतात ना! तुम्ही तसं सांगितल्याचं आठवलं. पूर्ण झाली का ती?''

''छे गं! कथा कधी संपूर्ण, समाप्त होतात का? त्या आपल्या मनात घडतच राहतात!''

# मोस्ट वॉन्टेड – कार्लोस द जॅकल

अपर्णा पाटील

कार्लोस द जॅकल हा शीतयुद्धाच्या काळातील जगातला मोस्ट वाँटेड गुन्हेगार. फ्रान्समध्ये दोन दशकांपूर्वी केलेल्या वेगवेगळ्या बाँम्बस्फोटांचा तो सूत्रधार आहे. त्याचं खरं नाव आहे, इलिच रमिरेझ सँझेज. तो सध्या फ्रान्समध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगतोय. १९७५ मधील तिहेरी हत्याकांड, १९८२ आणि १९८३ मधील फ्रान्समधील बाँम्बस्फोट या प्रकरणांत त्याला १९८४ मध्ये सुदानमध्ये फ्रेंच पोलिसांनी पकडलं. तेव्हापासून तो फ्रान्सच्या तुरुंगात आहे.

जगाला त्याची पहिल्यांदा ओळख झाली ती १९७५ मध्ये व्हिएन्नातील ओपेकच्या मुख्यालयावर झालेल्या हल्ल्यामुळे. ओपेकच्या कार्यालयात बैठकीसाठी जमलेल्या प्रतिनिधींना ओलीस ठेवलेल्या कार्लोसची झलक त्यावेळी लोकांनी टीव्हीवर पाहिली. विमानतळाच्या रनवेवर गॉगल घातलेला, चे गव्हेरा स्टाइलची कॅप आणि पिअर कारदाँ लेदर जॅकेट अशा डिझायनर वेशातला दहशतवादी लोकांनी प्रथमच पाहिला होता. रनवेवर ओलिसांशी चक्क हस्तांदोलन करणारा कार्लोस पुढची अनेक वर्षं चर्चेचा आणि हिंसाचाराचा विषय बनला.

अडतीस वर्षांपूर्वीच्या डिसेंबरमधलं ऑस्ट्रियातलं वातावरण नाताळच्या तयारीनं उत्साही झालेलं होतं. त्यातच २१ डिसेंबर १९७५ रोजी व्हिएन्नामध्ये महत्त्वाची बैठक होती. ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज म्हणजेच ओपेकचं मुख्यालय व्हिएन्नात आहे, त्या ठिकाणी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाच्या किमती



तरुणपणीचा कार्लोस

**ओपेकवर हल्ला केल्यामुळे कार्लोस नावाच्या दहशतवाद्याने जगभरात खळबळ उडवून दिली होती. बॉम्बस्फोट, हत्यांच्या आरोपाखाली तो सध्या फ्रान्समध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगत आहे. गेल्याच महिन्यात कार्लोसने फ्रेंच सरकारकडे शिक्षेतून सुटका मागत मायदेशात परतण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा कार्लोस चर्चेला आला. मार्क्सवादी विचारांनी भारावलेला पण रंगेल आयुष्य जगण्याची आवड असलेला कार्लोस नेमका आहे तरी कोण...?**

पुन्हा एकदा वाढवण्यासंदर्भात बैठक होती. त्या दिवशी ओपेकच्या मुख्यालयावर हल्ला होईल, अशी शंकाही कोणाच्या मनाला शिवलेली नव्हती. कारण ओपेकवर हल्ला करून कोणाला काय मिळणार, असा साधासा तर्क त्यामागे होता. शिवाय आतासारखी असुरक्षित स्थिती तेव्हा नव्हती. त्यामुळेच चौदा राष्ट्रांचे साठ महत्त्वाचे प्रतिनिधी सहभागी झालेल्या बैठकीच्या सुरक्षेची जबाबदारी केवळ दोन वयोवृद्ध पोलिसांच्या हाती होती.

नाही म्हणायला काही मैलांवर अँटी टेररिस्ट पोलिस कमांडोंचं कार्यालय होतं. म्युनिकमध्ये झालेल्या हत्याकांडामुळे ऑस्ट्रियन सरकारनं या विशेष दलाची स्थापना केली होती. पण तिथेही केवळ एक कमांडो नियुक्त केलेला होता.

रविवारी बैठक सुरू होताच पॉप्युलर फ्रंट फॉर द लिबरेशन ऑफ पॅलेस्टाइन (पीएफएलपी) संघटनेचा सदस्य असलेल्या कार्लोसच्या नेतृत्वाखालील सहा जणांच्या टीमनं ओपेकच्या मुख्यालयावर अत्याधुनिक शस्त्रांसह हल्ला केला. कार्यालयात शिरताच त्यानं आपल्याकडच्या मशीनगननं एका पोलिसाला ठार केलं. ते पाहून एका तेलमंत्र्याच्या बॉडीगार्डनं कार्लोसच्या टीममधल्या महिला दहशतवाद्याला पकडण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यामुळे हा हल्ला आणखी रक्तरंजित झाला. बचावलेल्या दुसऱ्या पोलिसानं कंट्रोल रूमला फोन करून हल्ल्याची माहिती दिली. काही वेळातच पाचशे पोलिसांनी मुख्यालयाला घेराव घातला. वीस मिनिटं दोन्ही बाजूंनी गोळीबार होत राहिला. पण त्यानंतर ओलिसांच्या जीवाला असलेला धोका लक्षात घेत

पोलिसांनी माघार घेतली. तोवर कार्लोसला नेमकं काय हवं आहे, हे कोणालाच कळायला मार्ग नव्हता.

कार्लोसनं ओलिसांपैकी एका महिला सचिवाची निवड करत ऑस्ट्रियाचे चॅन्सलर नेड्रोस्की यांच्याशी संपर्क साधला. त्यानं ओलिसांसह बाहेर पडण्यासाठी विमान हवं असल्याचं सांगितलं. चॅन्सेलरनं आधी ओलिसांची सुटका करायला सांगितलं. त्यानं काहींना सोडलं आणि दुसऱ्या दिवशी ३५ ओलिसांना घेऊन विमानतळावर पोहोचला. त्यावेळी सगळ्यांशी हस्तांदोलन करत विमानाकडे निघालेल्या कार्लोसचं फूटेज टीव्हीवरून लोकांनी पाहिलं. या सगळ्या कारवाईत जेव्हा जेव्हा तो सरकारशी संपर्क साधत होता, तेव्हा तो 'यापूर्वी अनेक बॉम्बस्फोट, हल्ले, हत्या करणारा कार्लोस तो मीच आहे', हे सांगत होता.

२२ डिसेंबरला सरकारनं पीएफएलपी आणि ओलिसांसाठी ज्या विमानाची सोय केली ते अल्जेरियाला जाणार होतं. त्या विमानाचा पायलट होता, नेवेली ॲटिकसन. लिबियाचे नेते मुम्मअर अल् गडाफींचा तो खासगी पायलट होता. या विमानात कार्लोसबरोबर बादीर-मेनहॉफ संघटनेचे सदस्य आणि अन्य बंडखोर नेते होते. त्रिपोलीला नेऊन सर्व ओलिसांची सुटका करण्यात आली.

ओपेकवरील हल्ल्यानंतर वर्षभरानं झालेल्या फ्रेंच विमानाच्या अपहरणाशी कार्लोसचा संबंध असल्याचं गुप्तचर यंत्रणांनी ताडलं होतं. फ्रान्स व अन्य देशांमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणण्यासाठी ते फ्रेंच जेटलायनर त्यानं पळवून एन्टेबे, युगांडाला नेलं होतं.

पॉप्युलर फ्रंट फॉर द लिबरेशन ऑफ पॅलेस्टाइन या पॅलेस्टाइनमुक्तीसाठी संघर्ष पुकारलेल्या संघटनेचा कार्लोस सदस्य होता. जी संघटना कडव्या डाव्या विचारसरणीच्या दहशतवादी गटाशी संलग्न होती. या संघटनेत असताना, त्यानं एका वर्षात ८३ लोकांना ठार केलं होतं. त्याला अटक केल्यानंतर



आताचा कार्लोस

१९९७ मध्ये फ्रेंच न्यायालयात चाललेल्या खटल्याच्यावेळी, मी व्यावसायिक क्रांतिकारी आहे. हे जग माझी युद्धभूमी आहे, असं सांगत आपल्या बळींचा हा आकडा त्यानं सांगितला होता.

अनेक वर्षं त्याचा चेहरा जगाला माहीत नव्हता. १९८१ मध्ये मेक्सिकन पोलिसांनी कार्लोसला पकडल्याचा दावा केला होता, पण तपासाअंती तो भुरटा चोर असल्याचं आढळलं. तोवर फक्त कार्लोसचा मिशी असलेला अस्पष्ट चेहरा टीव्हीवर पाहिल्यानं ही गफलत झाली होती. त्यामुळेच ज्याचा चेहरा ओळखता येत नाही, असा मिशीवाला तरुण हे शीतयुद्धाच्या काळात दहशतवादाचं प्रतीक ठरलं होतं. ओपेकवरील हल्ल्यामुळे मात्र कार्लोस कोण आहे, याचा शोध घेण्याचे प्रयत्न झाले. त्यातून मिळालेली माहिती मोठी रोचक होती.

कार्लोस ऊर्फ रमिरेझ सँचेझ हा मार्क्सवादी वकील जोस अल्तागार्सिया रमिरेझ-नवास आणि एल्बा मारिया यांचा मुलगा. तो व्हेनेझुएलामध्ये जन्मला. खरं तर त्याला ख्रिश्चन नाव द्यायचं आईनं ठरवलं होतं. पण कार्लोसच्या वडिलांनी आपल्या प्रत्येक मुलाला रशियन क्रांतिकारी नेते व्लादीमीर इलिच लेनिन यांचं नाव दिलं होतं... व्लादीमीर, इलिच आणि लेनिन.

जगभराची विचारसरणी तेव्हा कम्युनिस्ट आणि भांडवलशाही अशी विभागली गेली होती. मार्क्सवादी विचारांनी भारावलेली तरुणांची पिढी उदयास आली होती. या विचारसणीचं उग्र रूप कम्युनिस्टांच्या लढाऊ संघटनांमध्ये दिसू लागलं होतं. अशाच वातावरणात इलिच १९५९ मध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या युवा चळवळीत ओढला गेला.

इलिचचे आजोबा हे प्रस्थापितां-विरोधात हिंसेच्या मार्गानं सत्तापालट केला पाहिजे, अशा विचारांचे होते. इलिचमध्ये तीच वृत्ती होती. त्याच्या वडिलांप्रमाणे तो केवळ विचारांनी नाही तर कृतींनंही कडवा होता. त्याचे वडील मार्क्सवादी विचारांचे असले तरी उद्योगपती म्हणून बक्कळ पैसा बाळगून होते. त्यामुळेच त्यांच्या पैशांवर भरपूर खरेदी करणं आणि सुंदर स्त्रियांच्या सहवासात राहण्याचा छंद इलिचला जडला. पुढे दहशतवादी म्हणून वावरताना स्त्रियांनाच तो आपल्या सुरक्षेची ढाल बनवायचा.

१९६६ मध्ये त्याच्या आईवडिलांचा घटस्फोट झाला. त्याची आई, तिन्ही मुलांसह लंडनला पोचली. तिचं कॉलेजचं शिक्षण तिथेच झालं होतं. त्यामुळे पुढच्या आयुष्यासाठी तिथे स्थायिक होणं तिच्यासाठी योग्य होतं. पण इलिचची पंचाईत झाली होती. वडील जोस इलिचला पॅरिसला शिक्षणासाठी पाठवण्याच्या तयारीत होते. तर इलिचनं मॉस्कोच्या पॅट्रीस लुमुम्बा विद्यापीठात प्रवेश घेतला. हे विद्यापीठ म्हणजे रशियातल्या परदेशी कम्युनिस्ट चळवळीचं केंद्र होतं. याच चळवळीत अडकून पडलेल्या इलिचची पुढे विद्यापीठातून हकालपट्टी झाली.

इलिचनं मॉस्कोहून बैरूट, लेबनान असा प्रवास केला. याच दरम्यान तो पीएफएलपीमध्ये स्वयंसेवक म्हणून दाखल झाला. जॉर्डनमधल्या अम्मानमध्ये संघटनेकडून दिलं जाणारं दहशतवादी प्रशिक्षणही त्यानं घेतलं. गरीला प्रशिक्षण घेतलेला इलिच आता कार्लोस झाला होता. ज्यावेळी त्यानं १९७० मध्ये पॉप्युलर फ्रंट फॉर द लिबरेशन ऑफ पॅलेस्टाइनचं सदस्यत्व

स्वीकारलं तेव्हा बासम अबू शरीफ यानं त्याला कार्लोस हे सांकेतिक नाव दिलं. हे नाव त्याच्या दक्षिण अमेरिकन वंशाशी संबंधित असण्यामुळे दिलं होतं. वडीलही त्याच्या या दहशतवादी अवताराला पाठिंबा देत होते.

१९७० मध्ये उत्तर जॉर्डनमध्ये पीएफएलपीनं केलेल्या कारवायांमध्ये तो सहभागी झाला. त्यामुळे त्याची लढवय्या अशी इमेज तयार झाली. पण संघटना जॉर्डनमधून बाहेर फेकली गेली तेव्हा त्यानं बैरूटचा रस्ता धरला. वादी हदादनं त्याचं गुरूत्व स्वीकारलं. त्यानंतर त्यानं अरब राष्ट्र सोडून पुन्हा लंडनच्या पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश घेतला. पण संघटनेचं काम तो तिथेही राहून करतच होता. पॅलेस्टाइन मुक्तीचा झेंडा खांद्यावर घेत तो दहशतवादी झाला. रेड आर्मीचा सदस्य बनला.

कार्लोसला जेम्स बॉंड आवडायचा, हेही या संघटनांमध्ये ओढलं जाण्याचं आणखी एक कारण असेल. एकीकडे तो इलिच नावाचं आयुष्य जगत होता, तर कार्लोस नावानं तो हत्या, हिंसाचार घडवू पाहत होता. अनेक भाषा येत असल्यानं तो अनेक देशांत सहज आश्रय घेऊ शकत होता. ओपेकवरील हल्ल्यांपूर्वी अनेक ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटांमध्ये त्याचा हात होता. १९७३ मध्ये कार्लोसनं ज्यू उद्योगपती आणि ब्रिटिश झिओनिस्ट फेडरेशनचे उपाध्यक्ष जोसेफ सिफ यांच्या हत्येचा प्रयत्न केला. कार्लोस थेट त्यांच्या घरात घुसला. ते आंघोळ करत असताना थेट बाथरूममध्ये घुसून त्यानं अगदीच जवळून त्यांच्यावर गोळी झाडली. ती गोळी त्यांना लागली नाही, पण ते जखमी झाल्यानं बेशुद्ध होऊन पडले. पिस्तुल जॅम झाल्यानं कार्लोसला तिथून पळ काढावा लागला होता. या हत्येची योजना म्हणजे मोसादचे सदस्य मोहम्मद बोदीया यांच्या हत्येला दिलेलं प्रत्युत्तर होतं. त्यानंतर लंडनमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणले. हे हल्ले म्हणजे त्याच्या इस्राएलच्या बाजूला झुकलेल्या विचारसरणीचा परिणाम होता. त्यानंतरही काही अयशस्वी हल्ले त्यानं केले.



पत्नी आणि मुलीसह

पॅलेस्टाइन मुक्ती संघटनेचं लक्ष्य होतं ज्यू. त्यामुळे ठिकठिकाणी त्यांना लक्ष्य केलं जात होतं. ब्लॅक सप्टेंबरच्या हिंसाचारात तो होता. त्यानंतर ज्यूंवर हल्ला करणं त्याचं लक्ष्य ठरलं. मात्र म्युनिकमधल्या हल्ल्यात त्याला सहभागी केलं नसल्याची नाराजी त्यानं संघटनानेते वादी हदाद यांच्याकडे व्यक्त केली होती. आपल्याकडे नेतृत्व देत नसल्यानं तो तडतडत होता. त्याला सिफवर हल्ला करायचा होता, पण तिथे तो अयशस्वी ठरला होता. त्यानंतर एका बँकेवर केलेल्या हातबॉम्ब हल्ल्यानंही फार काही नुकसान झालं नाही. त्यामुळेच जेव्हा पीएफएलपीनं ओपेकवर हल्ल्याची योजना बनवली तेव्हा कार्लोसवर जबाबदारी टाकायचं ठरलं. पॅलेस्टाइन मुक्ती संघटनेला तेलाच्या किमती वाढायला हव्या होत्या आणि संघटनेच्या काही नेत्यांची मुक्तताही. शिवाय या हल्ल्याच्या निमित्तानं आपली संघटना किती पॉवरफुल आहे, हे दाखवून द्यायचं होतं. त्याहीपेक्षा कार्लोसला आपल्या यशाचा झेंडा फडकवण्याची ती एक संधी होती.

हा हल्ला फसल्यामुळे वादी हदादनं कार्लोसची संघटनेतून हकालपट्टी केली. आपल्या मागण्या मान्य होत नाहीत, हे दिसत असताना ओलिसांची हत्या करून, त्या मान्य करून घ्यायला हव्या होत्या, असं त्याचं म्हणणं होतं. नंतर काही वर्षांनी संघटनेतील एका सदस्यानं, कार्लोसनं एक दशलक्ष डॉलर्स प्रत्येक ओलिसामागे घेतले होते ते पैसे कार्लोसनं आपल्या नावावर ठेवल्याचा आरोप केला. तो हल्ला जरी अयशस्वी झाला असला तरी कार्लोसला प्रचंड लोकप्रियता त्या घटनेनं मिळवून दिली.

अल्जिअर विमानतळावर नाताळच्या दिवशी त्यानं ओलिसांना सोडलं, तेव्हा त्याला सार्वजिनक ठिकाणी पहिल्यांदा आणि शेवटचं पाहिलं गेलं होतं. त्यानंतर इंटरपोलनं मात्र त्याचा पिच्छा पुरवण्यास सुरुवात केला. पीएफएलपी सदस्य मिशेल मुखबराल हा मोसादचा एजंट बनला. त्याला फ्रेंच गुप्तचर संघटनेनं अटक केली. तेव्हा त्यानंच पहिल्यांदा कार्लोसची माहिती पुरवली. त्यामुळेच फ्रेंच गुप्तचर संघटनेचे दोन एजंट आणि मुखबराल त्याच्या घरी पोचले. बाथरूमला जाण्याचा बहाणा करून बाहेर येताच त्यानं एजंट आणि मुखबरालला गोळ्या घातल्या. त्यानंतर तो बैरूटला पळाला. कार्लोसचा हा बायोटाडा पोलिस आणि गुप्तचर संघटनेचा तो वॉंटेड गुन्हेगार होण्यासाठी पुरेसा होता. ओपेकवरील हल्ल्यानंतर जगात जिथे जिथे हल्ले होत आहेत, ते कार्लोसमुळेच अशी वदंता पसरली.

मीडिया आणि त्याच्या कारवायांनी तो मोठा झाला. मोसाद, सीआयए, फ्रेंच इंटलेजन्स आणि काही देशांतील सरकारांनी आपआपल्या सोयीसाठी त्याच्यावर काही हल्ल्यांचे आरोप टाकले त्यामुळे तो मोठा झाला. युरोपमध्ये कार्लोसच्या कारवाया वाढत चालल्या होत्या. तर नव्या नव्या महिलेसोबत तो संबंध राखून होता. स्पॅनिश महिला अँजेला हिच्याबरोबर राहत असे. त्यानंतर नॅन्सी सँझेजला आपण उद्योगपती असल्याचं सांगितलं होतं. आपली बिझनेस टूर संपवून परतल्यावर तो पार्टी देत असे. अशाच एका पार्टीत पोलिस शिरले. त्यानं दोन जणांना मारलं. त्यानंतर पळाला. त्यासाठी अल्जेरिया सरकारनं त्याची मदत केली. नॅन्सीला मात्र त्याचा त्रास झाला.




व्लादीमोर हा कार्लोसचा भाऊ
१५ मे २०१३ रोजी
फ्रेंच सरकारचा निषेध करताना

पोलिस तिची रोजच चौकशी करत होते. पण कार्लोसला त्याच्याशी काही देणंघेणं नव्हतं.

१९८२ मध्ये त्यानं ठिकठिकाणी दहशतवादी हल्ले करून फ्रेंच सरकारच्या नाकात दम आणला होता. त्यावेळची त्याची प्रेयसी मॅग्डेलना कोप हिला तुरुंगातून सोडलं नाही तर, फ्रान्समध्ये घातपाती कारवाया, दशहतवादी हल्ले करण्याची धमकी त्यानं दिली होती. मॅग्डेलना ही पश्चिम जर्मनीतल्या कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनेशी संबंधित होती. कार्लोसच्या धमक्या निव्वळ फुशारक्या नव्हत्या, हे रेल्वेमधील व स्टेशन्सवर झालेल्या दोन स्फोटांवरून लक्षात आलं. तिला फ्रान्स सरकारनं सोडून दिल्यावर ते एकत्र आले. त्यांना एक मुलगीही झाली. मॅग्डेलना ही त्याची पहिली पत्नी. नंतर ते विभक्त झाले.

अनेक वर्षं कार्लोस द जॅकल कोण आहे, ते फक्त त्याच्या ब्लॅक अँड व्हाइट फोटोग्राफ्समधून कळत होतं. पण १९८९ मध्ये कम्युनिझम लयाला गेला आणि त्याचं क्रांतिकारी दहशतवादी असं जे करिअर होतं ते संपलं. १४ ऑगस्ट १९९४ रोजी सुदानमध्ये एक शस्त्रक्रिया झाल्यानं आराम करत असताना तो पकडला गेला. सुदान सरकारच्या मदतीनं फ्रेंच गुप्तचर यंत्रणेच्या एजंटांनी त्याला पकडलं. तेव्हापासून तो तुरुंगातच आहे.

तुरुंगात गेल्यावरही त्याची प्रेमप्रकरणं थांबली नाहीत. त्याची बाजू मांडणारी फ्रेंच वकील कोटंट पायर हिच्याशी त्यानं अनौपचारिकरीत्या विवाह केला. सध्या कार्लोसची शिक्षा रद्द व्हावी, त्याला पुन्हा मातृभूमी व्हेनेझुएलाला परतता यावं, म्हणून ती फ्रेंच कोर्ट आणि प्रसिद्धी माध्यमांच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवत आहे.

व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष ह्युगो शावेझ यांनी, त्याचा क्रांतिकारी लढवय्या असा उल्लेख केला होता. त्यांच्या मदतीमुळेच त्याला तुरुंगात सिगार आणि व्हेनेझुलएन कॉफी मिळत होती. पण त्यांच्या निधनानं कार्लोसनं प्रमुख समर्थक गमावला आहे. त्यामुळे त्यानं आता मायदेशी परतण्याची मुभा देण्यासाठी अपील केलं आहे.

आज जगभरात दहशतवादी संघटनांनी आपले पाय रोवले आहेत. त्यातले काही म्होरके आपल्याला माहीतही आहेत. त्यांच्याविषयी जाणून घेणं हा औत्सुक्याचा विषय ठरतो. पण ओपेकवर हल्ला करणारा दहशतवादी म्हणून कार्लोसविषयीचं कुतूहल न शमणारं आहे.

## द डे ऑफ जॅकल

कार्लोसचं नाव इलिच असलं तर तरी ब्रिटिश टॅबलॉइडनं त्याला जॅकल नाव दिलं होतं. त्यानं काही काळ लंडनमध्ये आश्रय घेतला होता. त्या घराची झडती घेण्यात आली तेव्हा फ्रेडरिक फोर्स्थची १९७१ मध्ये लिहिलेली आणि प्रचंड गाजलेली कादंबरी 'द डे ऑफ जॅकल' सापडली होती. ही कादंबरी फ्रेंच राष्ट्राध्यक्ष चार्ल्स द गॉल यांच्या हत्येसाठी नेमलेल्या व्यावसायिक मारेकऱ्यावर आधारित होती.

## चित्रपट आणि पुस्तकं

टॉम क्लॅन्सी आणि रॉबर्ट लुडलम यांना कार्लोस द जॅकलनं कादंबरी लिहिण्यास प्रेरित केल्याचा उल्लेख ब्रिटिश लेखक कोलिन स्मिथ यांनी लिहिलेल्या कार्लोसच्या चरित्रात केला आहे.

२०१० मध्ये 'कार्लोस' नावाची साडेपाच तासांची फिल्म तयार करण्यात आली. त्याला ग्लोडन ग्लोब पुरस्कार मिळाला होता.

याशिवायही त्याच्यावर अनेक चित्रपट आले, टीव्ही शोमध्ये त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न झाला. त्याचा अगदी पहिल्यांदा जाहीर झालेला फोटो तर ब्रिटिश बँड ब्लॅक ग्रेपच्या म्युझिक अल्बमच्या कव्हरसाठी वापरला गेला.

**– अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

# कायद्याला तीन वर्षे झाली, पुढे काय?

भाऊसाहेब चासकर

एक एप्रिल २०१० रोजी राज्यात शिक्षण हक्क कायदा लागू झाला. त्याला आता तीन वर्षे झाली. तीन वर्षांचा काळ म्हणजे फार मोठा नाही, हे खरे असले तरीही कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर गेल्या तीन वर्षांत राज्याच्या शिक्षणविश्वात नेमके काय झाले, सध्या सुरू आहे, याची नोंद घेऊन अधिक-उणे तपासून पुढे जाण्याची ही वेळ आहे.

कायद्यातील पहिल्याच कलमानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण देण्याची तरतूद आहे. कायदा लागू झाल्यानंतर मोठ्या संख्येने असलेल्या बऱ्याच शाळाबाह्य मुलांसह गतिमंद, मतिमंद आणि विशेष गरजा असलेली समस्याग्रस्त अनेक मुले शिक्षण प्रवाहात दाखल झाली. हळूहळू शिकती झाली, होताहेत. काही कमतरता असल्या तरी बहुतेक शाळांत विद्यार्थीसंख्येनुसार वर्गखोल्या, शैक्षणिक साहित्य, स्वच्छतागृहे, किचनशेड, रॅम्प, पिण्याचे पाणी आणि संरक्षक भिंत अशा कायद्याला अपेक्षित असणाऱ्या भौतिक सोयी-सुविधांनी शाळा समृद्ध झाल्यात. रंगरंगोटी आणि सजावटीमुळे इमारतीही देखण्या झाल्यात. एकूणच मुलांना शिकावेसे वाटेल, असे वातावरण निर्माण झाले आहे.

आधी उल्लेख केल्यानुसार अनेक शाळाबाह्य मुले दाखल झाली, हे खरे आहे. आणखी शाळाबाह्य मुले दिसल्यास कारवाई करू, असा दम वरचे अधिकारी खालच्या अधिकाऱ्यांना भरतात. खालचे अधिकारी हाताखालच्या शिक्षकांना दम देतात. नोटीसा काढतात. वास्तविक कायद्याने मुलांना शाळेत आणायची, टिकवायची आणि आठवीपर्यंत शिकवायची जबाबदारी सरकारी यंत्रणा आणि समाज यांच्यावर संयुक्तपणे सोपवली आहे असे असले तरी सध्या केवळ शिक्षकांना जबाबदार धरले जात असल्याचे चित्र दिसते आहे. रोजीरोटीच्या संघर्षात गुंतलेल्या पालकांच्या मर्जीवरच त्यांच्या मुलांचे शिक्षण चालते. मुलांना शाळेत धाडायचे की त्यांनी अन्न-पाण्याच्या शोधात भटकायचे, असा यक्षप्रश्न आ वासून त्यांच्यासमोर उभा असतो. काही कोवळी मुलेच कमावती असतात. जगण्याची लढाई शिक्षणावर मात करते. मुख्य म्हणजे १२-१४ वर्षांची मुले वर्गात आणून बसवली की ती शिकतील, शहाणी होतील, त्यांचे जगणे बदलून जाईल, असा गोड समज आपण करून घेतलेला दिसतो. अनेकदा वर्गात आहे त्या मुलांना शिकवायचे की तिकडच्या मुलांमागे धावायचे, असा प्रश्न शिक्षकांना पडतो. त्यामुळेच शालाबाह्य मुलांच्या शिक्षणाचे पडद्यामागचे वास्तव वेगळेच आहे. म्हणूनच स्थलांतरितांच्या मुलांबाबत वास्तववादी आणि सर्वसमावेशक दृष्टिकोनातून विचार होण्याची गरज आहे.

कायदा, त्याची अंमलबजावणी, त्याची प्रशिक्षणे, मूल्यमापनाच्या पद्धती-मधील बदल या सगळ्याच गोष्टी अत्यंत घाईघाईने लादल्या गेल्या, असे शिक्षकांना वाटते. कारण कोणतीही जुनी व्यवस्था त्या व्यवस्थेत काम करणाऱ्या घटकांच्या अंगात पक्की मुरलेली असते. एका रात्रीत ती मोडीत काढता येत नाही! कायद्यातला बालस्नेही दृष्टिकोन, त्यातली ज्ञानरचनावादी विचारसरणी आणि त्यापुढे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन...एकूणच कायद्याच्या अंमलबजावणीबाबत शिक्षक, अधिकारी, तज्ज्ञ मंडळी आणि संस्था-संघटनांत आजही मोठा संभ्रम आणि गोंधळाची स्थिती दिसते. कायद्यामुळे विशेष गरजा असलेली मुले सामान्य शाळांत दाखल झाली आहे. त्यांना आठवीपर्यंत किमान संपादणूक पातळीपर्यंत नेण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. मात्र त्यासाठी शिक्षकांना योग्य ते प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळत नाही, याचाही अतिरिक्त संबधित ताण शिक्षक आणि शाळांवर येतो.

शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने सध्याचा काळ म्हणजे संक्रमणकाळ आहे. २००५मध्ये राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, त्यानंतर २०१०चा राज्य अभ्यासक्रम आराखडा आणि पुढे १ एप्रिल २०१० रोजी आलेला शिक्षणाचा कायदा. शिक्षणासारख्या अत्यंत महत्त्वाच्या,जिव्हाळ्याच्या क्षेत्रात खरेच क्रांतिकारक ठरू शकतील, असे हे बदल आहेत. मात्र एकापाठोपाठ एक अशा अत्यंत वेगाने आलेल्या या बदलांनी शिक्षणविश्वात भांबावलेपण आणलेय. या बदलांचे स्वागत करताना ते अतिशय काळजीपूर्वक, संयमाने लागू करायला हवे होते. जे लोक खरेच फिल्डवर असे काम करताहेत त्यांचे अनुभव, मते अभ्यासायला हवी होती. संभाव्य

अडचणी, करावयाच्या उपाययोजना याचाही साकल्याने विचार झालेला दिसत नाही. एवढा आमूलाग्र बदल शिक्षकांच्या पचनी पडणे, यासाठी त्यांचे मानस' घडवणे याला पुरेसा वेळ द्यायला हवा होता. परिणामी या बदलांना सामोरं जाताना तळातला घटक असलेल्या शिक्षकांच्या मनावर सगळ्याचा किती ताण येतो, याचा विचार होत नाही.

सर्व शिक्षा अभियानाने सुरू केलेल्या नानाविध प्रशिक्षणांची संख्या कायदा लागू झाल्यावर आणखी वाढली. या प्रशिक्षण वर्गांची भारी गंमत आहे. नवीन रचनावादी विचारसरणीची प्रशिक्षणे१०० टक्के वर्तनवादी (अलिकडे शिक्षणाच्या क्षेत्रात जी सध्या टाकाऊ किंवा अस्पृश्य मानली जाते!) पद्धतीने होताहेत. कायद्यातल्या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा (Comprehensive -nd Continuous Evaluation) गाभा असलेल्या रचनावादीशिक्षण पद्धतीची प्रशिक्षणे अशी झाली, तर रचनावाद वर्गात कसा येणार? चार दिवसांचे शिक्षकांचे प्रशिक्षण झाले की, आता कालचे सोडा, उद्यापासून नव्या पद्धतीने काम सुरू करा, असा फतवा निघतो. लगेच चार-सहा महिन्यांत सगळीकडे ज्ञानरचनावादी, बालककेंद्री शिक्षणाचे ताटवे फुललेले दिसतील, असे मानणे हा निव्वळ भाबडेपणा आहे.

कायदा सांगतो की, पहिल्या ते पाचव्या वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकांनी शिक्षणाचे ८०० तास आणि सहाव्या ते आठव्या वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकांनी १००० तास शिकवायचे आहे. तसे होताना दिसत नाही. याउलट आज शिक्षकांची आर्त हाक आहे की, आम्हाला मुलांसमोर राहुद्या. त्यांचे कोणी ऐकतच नाही. यंदा डिसेंबरपासून आधी विकास आराखडा नंतर यु-डायसच्या माहिती संकलनात बरेच दिवस गेले. जानेवारीपासून राज्याच्या शिक्षणक्षेत्रात प्रशिक्षणोत्सव सुरू आहे! फेब्रुवारी-मार्चमध्ये याचा कळसाध्याय झाला! त्यातून शिक्षकांच्या पदरात काय पडतेय ते विचारूच नका. पण प्रशिक्षणकाळात निम्मे शिक्षक प्रशिक्षणास जातात. उरलेल्या निम्म्यांवरच संपूर्ण शाळा चालवण्याची जबाबदारी येते! तिकडे प्रशिक्षणातून पदरात फारसे काही पडत नाही आणि इकडे शाळाही नीट चालत नाही! आता शिक्षकांना याचा उबग आलाय. दोनशिक्षकी शाळेत तर वेगवेगळ्या कारणांमुळे एका शिक्षकास किमान निम्मे दिवस शाळेबाहेर राहावे लागते, मग मुलांशी शिक्षकाची गाठ पडणार कधी? गुणवत्ता येणार कशी?

३० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे प्रमाण कायद्याला अभिप्रेत आहे. खासगी अनुदानित माध्यमिक शाळांत एका वर्गात ६०,७०,८० मुले कोंबली जाताहेत. या मर्यादांमुळे स्वाभाविकच रचनावाद तिथे 'मिसिंग' आहे! काही सरकारी शाळांमध्येही ५०च्या आसपास मुले आहेत. पट पडताळणीच्या त्या अध्यायानंतर राज्यात शिक्षकभरतीच बंद आहे. बोगस शाळा आणि त्या भानगडी राहिल्या बाजूला. रोगापेक्षा इलाज भयंकर असे चित्र असल्याने सध्या अनेक शाळांना, मुलांना याचा त्रास होतोय. याचे दायित्व सरकारला नाकारता येणार नाही.

गेली तीन वर्षे शिक्षक आणि मुलांना छळणारी एक अजून गोष्ट म्हणजे पाठ्यपुस्तके. बालभारतीची सध्याची पुस्तके वर्तनवादी पद्धतीची आहे. त्या पुस्तकांशी रचनावादी पद्धत, मूल्यमापन मेळ खात नाही. त्यामुळे धड ना वर्तनवाद धड ना रचनावाद' अशी आजमितीस शिक्षणपद्धतीची शोकांतिका झाली आहे. आता आठवीपर्यंत नापास नाही, अशी कायद्यात तरतूद आहे. याविरुद्ध मोठी ओरड सुरू झालीय, पूर्वीप्रमाणेच परीक्षा सुरू करण्याची मागणी होतेय. एक नवीन पद्धत कुठे पचनी पडतेय, तोच पुन्हा पूर्वीप्रमाणे परीक्षा घ्याव्या लागणार की काय, यामुळेही शिक्षकांत अस्वस्थता आहे.

आज शिक्षण व्यवस्थेत सगळ्यात जास्त स्थित्यंतराच्या अवस्थेतून जाणारा घटक असेल तर तो आहे शिक्षक. असंख्य अशैक्षणिक कामे, प्रशिक्षणे, धोरणांतल्या धरसोड वृत्तीमुळे सतत होणारे बदल, मुलांच्या वाढत्या वर्तनसमस्या यामुळे शिक्षक अक्षरशः मेटाकुटीला आलेत. इतर सगळ्याच पेशांमध्येआहेत, तशा कामचुकार प्रवृत्ती शिक्षकी पेशातही आहेत; हे आम्ही अमान्य करत नाही. पण बहुसंख्य शिक्षक आजही तळमळीने काम करतात. आज जो उठतो तो शिक्षकांना आदेश देतो, उपदेश करतो. कायद्यावर बोट ठेवतो. निलंबनाच्या धमक्या देतो.परिणामी चांगले शिक्षकदेखील निराश झालेत. याचा कामावर प्रतिकूल परिणाम होतोय. एखाद्या शिक्षकाने नीट शिकवण्याच्या कर्तव्यात कसूर केली, म्हणून नोटीस दिल्याचे ऐकीवात नाही. याउलट बांधकाम, मतदार याद्या, गणवेश, शालेय पोषण आहार, कागदपत्रे, अहवाल अशा कारणांवरून शिक्षकांना नोटीसा बजावल्या जातात. कायद्याच्या नावाखाली शिक्षण प्रशासनाने खासगी शाळाचालकांना अक्षरशः वेठीला धरलेय. कायद्यातले ११ मानांकने पूर्ण करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? सरकारची, संस्थांची की शिक्षकांची? किचन शेड, संरक्षक भिंत, पाण्याची टाकी, विद्यार्थीसंख्येनुसार वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, खेळाचे मैदान, रॅम्प, ग्रंथालय, शैक्षणिक साहित्य आदी गोष्टींसाठी प्रशासन हात-पाय धुऊन मागे लागलेय.

कायद्याला अभिप्रेत नवीन अभ्यासक्रम धिम्या गतीने येतो आहे. तीन वर्षे झाली तरी राज्यात पाचवी आणि आठवीचे वर्ग सरकारी शाळांना जोडायचे की कसे, याचा घोळ सुरूच आहे. शिक्षकांसाठीची पात्रतापरीक्षा (TET) उंबरठ्यावर आली आहे. याबाबत गोंधळाचे वातावरण आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना २५ टक्के प्रवेश देताना खासगी शाळाचालक मखलाशी करताहेत. शाळा विकासाचे आराखडे तयार झाले खरे; निधी मिळालेला नाहीये. खालपासून वरपर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या सतत बदल्या होत राहतात. त्यामुळे कामात एकवाक्यता राहात नाही.

शाळा व्यवस्थापन समित्यांचे बळकटीकरण आणि कायद्याबाबत पालकांत साक्षरता येणे महत्त्वाचे आहे. केवळ भौतिक सुविधांसाठी समाजाचा सहभाग पुरेसा नाही तर ज्ञानाच्या निर्मितीतही त्यांची भूमिका महत्त्वापूर्ण ठरणार आहे. कायदा आलाय तो देशातील मुलांच्या भल्यासाठी. त्यात उणिवा, त्रुटी जरूर आहेत. अंमलबजावणीतही काही अंशी मनमानी होतेय.

अंतिमतः देशातली सगळी मुले शाळेत आली पाहिजेत. ती टिकली पाहिजेत. त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे, असा कायद्याचा आग्रह रास्तच आहे. यासाठी शाळा-शिक्षकांनी १० पावले टाकली तर समाजाने ५ पावले टाकली पाहिजेत.धोरण आखणाऱ्यांनी आणि अंमलबाजवणी करणाऱ्यांनी कायद्याच्या कलमांच्या तांत्रिक जंजाळात अडकून न पडता परस्पर सहकार्य आणि एकमेकांवर विश्वास ठेवत पुढे जायला हवे. कारवाईच्या बडग्याने कायद्याची उचित कार्यवाही होईल, अशा भ्रमात राहता कामा नये. नवे प्रयोग करत असताना आज गरज आहे ती समाजाने शिक्षकांवर विश्वास दाखवण्याची, थोडा धीर धरण्याची आणि सरकारी यंत्रणेने त्यांना पाठबळ देण्याची!


**- भाऊसाहेब चासकर**
माहेर, रतनगड सोसायटी, नवलेवाडी,
अकोले (अहमदनगर) ४२२६०१
भ्रमणध्वनी- ९८८११५२४५५
bhauchaskar@gmail.com

**पुढला अंक जुलै-ऑगस्ट जोड अंक असेल. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या बोस्टन येथील अधिवेशनानिमित्त हा विशेषांक 'गोष्ट ग्लोबल लग्नाची' हा विषय घेऊन येत आहे.**

**डॉ. नरेंद्र जाधव यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला विचारसमृद्ध ग्रंथ**

# लसावि

माझ्या समग्र अभिव्यक्तीचा




**डिलक्स आवृत्ती**
**मूल्य ८०० रु.**
**सवलतीत ५०० रु.**
**टपालखर्च ७५ रु.**

**जनाआवृत्ती**
**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**
**टपालखर्च ७५ रु.**

नरेंद्र जाधवांनी मांडलेला 'लसावि - माझ्या समग्र अभिव्यक्तीचा' हा खरोखरच 'लसावि' आहे. कारण, खरे म्हणजे 'मसावि' खूपच महत्तम आहे. प्रस्तुत 'लसावि'मध्ये नरेंद्र जाधवांची विचारांची झेप, त्यांचे समृद्ध अनुभवविश्व- व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक, त्यांचा लोकसंग्रह आणि त्यांचा झापटा यांचा 'प्रोमो' वाचायला/पाहायला मिळतो.

**- कुमार केतकर**
(प्रस्तावनेमधून)

डॉ. नरेंद्र जाधव यांनी वेगवेगळ्या ठिकाणी कार्य करत असताना जे लेखन केले आहे त्याची संख्या विपुल आहे. या ग्रंथातील त्यातले निवडक लेखन पाहिले तरी त्यांच्या आस्थेचा आणि संवेदनशीलतेचा परीघ किती विस्तृत आहे, याची कल्पना येते. त्यात समाज, संस्कृती, राजकारण या गोष्टी जशा येतात, त्याचप्रमाणे शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण व त्याचे भारतात उमटणारे प्रतिसादही येतात. परंतु अर्थशास्त्र हा त्यांच्या खास अभ्यासाचा आणि विद्वत्तेचा विषय आहे. माझ्या दृष्टीने त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे अर्थशास्त्रज्ञ म्हणून डॉ. आंबेडकरांचा त्यांनी केलेला विस्तृत असा विचार होय. 'डॉ. आंबेडकर : एक उपेक्षित अर्थतज्ज्ञ' हा लेख या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर ज्या विविध भूमिका निभावल्या, त्यामुळे त्यांचे अर्थशास्त्रातील कार्य दुर्लक्षित राहिले. महाराष्ट्राच्या विचारविश्वातील ही उणीव डॉ. जाधव यांनी समर्थपणे भरून काढली आहे.

**- डॉ. नागनाथ कोत्तापल्ले**
(प्रस्तावनेमधून)

# श्रद्धा

डॉ. माधवी मेंहेदळे

ईश्वरावर आपली श्रद्धा आहे का असा रोखठोक सवाल मी स्वत:ला आतापर्यंत कधीच विचारला नाही. मी बहुधा 'आहे' आणि 'नाही' यामध्ये कुठेतरी असावी. 'मी नास्तिक आहे', 'देव अस्तित्वात नाही' असं छातीठोकपणे म्हणणाऱ्यांइतकं धारिष्ट्य माझ्यात नाही. परीक्षा असताना कॉलेजला निघायच्या आधी माझी मैत्रीण न चुकता संपूर्ण रामरक्षा म्हणायची. एकीकडे तिला हसत असताना मीही कठीण पेपरच्या वेळेस देवापुढे हात जोडायचे. प्रसंग 'बाका' असताना देव आहे की नाही, आपल्या या हात जोडण्यानं नक्की काय होणार आहे असा विचार करायचं मी टाळायचे. तेव्हा ती कदाचित फक्त एक सोय असावी. देव जर असला तर हात जोडण्यानं फायदाच होईल आणि नसला तर हात जोडण्याने नुकसान नक्कीच काही नाही. निदान आपल्याला तेवढ्यापुरतं बरं वाटतं एवढा तरी फायदा आहे.

मी स्वत:ला बुद्धिवादी व कर्मवादी समजते. 'देव' या संकल्पनेबरोबर चिकटून बुद्धीला न पटणाऱ्या अनेक गोष्टी येतात. त्यांचं काय करायचं अशी माझीतरी पंचाईत होते. देव म्हणजे कुठलीतरी एक शक्ती जी आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे, जिच्याकडे आपल्याला न मिळणाऱ्या प्रश्नांची उत्तरं आहेत. कदाचित ती कुठलीतरी किंवा कुठल्यातरी स्वरूपातील ऊर्जा आहे किंवा निसर्गाच्याच एखाद्या स्वरूपाचं ते नाव असू शकेल... असे सर्व प्रकारचे विचार मनात येतात.

कुठल्यातरी स्वरूपातील 'त्या' शक्तीचं अस्तित्व मला मान्य असावं असं वाटतं. मी सर्जन आहे. शस्त्रक्रिया करत असताना किती गोष्टी आपल्या हातात असतात पण त्याचबरोबर किती गोष्टी हाताबाहेर असतात, हे माहिती आहे. एखादी जखम शिवत असताना आम्ही दोन टाक्यांमध्ये काही अंतर ठेवून टाके घालतो. मला एका लहान मुलीनं विचारलं, 'डॉक्टर, तुम्ही जिथे टाके घालता तिथली जखम टाक्यांमुळे भरून येते हे समजलं. पण दोन टाक्यांच्या मधली जखम कशी भरून येते?' मी एकदम दचकले. 'ती' जी कुठली 'शक्ती', 'निसर्ग', 'ऊर्जा' आहे, ती तिचं अस्तित्व अशा ठिकाणी दाखवते असं लक्षात आलं. दोन टाक्यांमधली जखम, जखमेच्या दोन कडा टाक्यांनी एकमेकांजवळ आणून ठेवल्या की, आपोआप भरून येते. निसर्गाच्या शक्तीमुळे भरून येते असं आम्ही डॉक्टर लोक समजतो. ती भरून येते या भरवशावर तर आम्ही सर्जन लोक आमची शस्त्रं वापरून जखम निर्माण करतो, शस्त्रक्रिया करतो. स्वत:ची अगदी नवीन प्रॅक्टिस सुरू झाली तेव्हा अवघड सर्जरी करण्याआधी मी देवासमोर हात जोडायचे. एक क्षण डोळे बंद करून उभी राहायचे. त्यामुळे मनातील चलबिचल शांत व्हायची. मन एकाग्र व्हायला मदत व्हायची. जसजशी मी सिनियर व अनुभवी होत गेले तसतसा हा प्रकार कमी झाला. ऑपरेशन थिएटरमध्ये शिरताना आपोआपच मन शांत व्हायला लागलं. मात्र ऑपरेशन थिएटरमध्ये समोर गणपतीचा फोटो आहे. कधी कधी ऑपरेशन करत असताना असं वाटायला लागतं की अगदी सोपी केस आहे. ऑपरेशन काय पटकन होऊन जाईल! असा विचार आला की मी दचकते. कुठलंच ऑपरेशन सोपं समजायला नको. मग मी एक क्षण थांबते. मायक्रोस्कोपमधील नजर काढून समोरच्या गणपतीच्या फोटोवर नजर स्थिरावते. मन एकाग्र करते. मग पुन्हा सर्जरी सुरू करते. याला ईश्वरावर श्रद्धा म्हणायचं का? काय म्हणायचं मला माहीत नाही. कदाचित ही फक्त सकारात्मक विचार करण्याची पद्धत आहे किंवा आपल्या मनाला संदेश देण्याची पद्धत आहे, असंही असू शकेल.

कॅरम खेळताना समोरची सोंगटी खेळायला अगदी सोपी वाटत असली तरी मनात जर त्याक्षणी आलं की सोपी असली तरीसुद्धा मारल्यावर जाणार नाही, मिळणार नाही तर आपल्या हातून चुकीच्या पद्धतीनं स्ट्राईकर मारला जातो व गोटी जात नाही. त्याउलट कॅरम बोर्डवर अगदी कठीण ठिकाणी जरी सोंगटी असली आणि मनात आलं की आता ही नक्की मिळणार, की स्ट्राइकर आपण बरोबर तसा मारतो व सोंगटी आपल्याला मिळते. हा माझा नेहमीचा अनुभव आहे. आता या सगळ्याचा 'देव' – 'श्रद्धा' याच्याशी काय संबंध आहे असे वाटू शकेल, तर सकारात्मक विचारांमुळे आपल्या कर्मावर किंवा आपण जे 'करतो' त्यावर निश्चित प्रभाव पडू शकतो याचे हे उदाहरण आहे. एक अनुभव आहे.

मन शांत असेल, सकारात्मक असेल, आश्वस्त असेल तर हातून चांगलं कर्म घडू शकतं. श्रद्धा व कर्म यांचं हे नातं आहे. श्रद्धा

मनाला शांत व आश्वस्त करते.

'देवाच्या मनात असेल तसे आपोआप होईल' असा दृष्टिकोन ठेवला तर हातून काही कार्यच होणार नाही. त्यामुळे 'श्रद्धा' हवी पण प्रयत्नवादाचे दरवाजे बंद करणारी नको.

दु:खाच्या प्रसंगात, एकटेपणात कुठेतरी, कोणावरतरी श्रद्धा असेल तर सावरायला मदत होते. याउलट कधी कधी देवावर श्रद्धा असेल तर पंचाईत सुद्धा होऊ शकते.

माझ्या ओळखीच्या एका कुटुंबात सासरे पक्के नास्तिक तर सून श्रद्धाळू. अतिशय सज्जन असलेल्या त्यांच्या मुलाचा त्याची काहीही चूक, संबंध नसताना निर्घृण खून झाला. त्यांचं जग हादरलं. मीही हादरलेच होते. मला वाटलं, श्रद्धाळू सुनेला देवाचा आसरा असल्यानं या कठीण प्रसंगातून जाणं तिला जरा तरी सह्य झालं असेल, पण नास्तिक बापानं आपल्या मुलाचं असं अनैसर्गिक मरण कसं सोसलं असेल? पण ते आजोबा मला म्हणाले, उलट मीच त्या सर्व आस्तिक लोकांना सावरलं. 'देव' नाही असा माझा दृढ समज असल्यानं मला जरातरी सोपं गेलं, मात्र 'देव' असा कसा वागला, त्यानं असं कसं घडू दिलं याचं उत्तर श्रद्धाळू सुनेला मिळालं नाही. त्यामुळे देवावर असलेल्या तिच्या श्रद्धेमुळे तिची मनस्थिती अजूनच गोंधळल्यासारखी झाली.

ईश्वराचं अस्तित्व मानण्यामुळे ही बुद्धिवाद्यांची पंचाईत होऊ शकते असं मघाशी म्हटलं, ते अशासाठी की ईश्वराचं दृश्य रूप किंवा त्याच्या प्रतिमेचं दृश्य रूप एवढ्या विविध प्रकारचं आहे की बुद्धिवादाचा पराभव वाटतो.

गणपतीचा फोटो ऑपरेशन थिएटरमध्ये असतो, पण गणपतीचाच का म्हणून? शंकर, विष्णू, सरस्वती अशी ईश्वराची अनेक रूपं सांगितली आहेत! काही धर्मांत तर ईश्वराची प्रतिमाच नाही. सर्व धर्मांबद्दल मला आदर आहे. 'माणुसकी' महत्त्वाची. मग ईश्वराच्या या वेगवेगळ्या रूपांचं किंवा अरूपाचं काय करायचं असा बुद्धीला प्रश्न पडतो. ईश्वर चराचरात आहे, तुमच्या-माझ्यात आहे, मग या वेगवेगळ्या प्रतिमा कशासाठी?

तसाच प्रश्न प्रार्थनेच्या निरनिराळ्या पद्धतींसाठी. नमस्कार करायलाच पाहिजे का? नुसतं ईश्वराचं स्मरण पुरेसं नाही का? कर्मकांड-देवळं-पुजारी-सोन्याचा साठा असलेली श्रीमंत देवळं -दर्शन घ्यायला मोठ्ठी रांग-जास्त पैसे दिल्यास लवकर दर्शन - या सर्व प्रकारांचा तर उबगच येतो. जगन्नाथपुरीच्या देवळात दानपेटीत पैसे टाका नाहीतर आत जाऊ देणार नाही असाच पवित्रा पुजाऱ्यानं घेतला. मी म्हटलं, मी आत जाणार - पैसे न टाकता जाणार - तुम्ही अडवून दाखवा. अर्थात अडवता आलं नाही, पण श्रद्धेचा असा बाजार आणि लोकांची पिळवणूक उद्विग्नता आणते.

देवाचे दूत-गुरू-बुवा असे; भक्त आणि देव यांच्यामधले दलाल स्वत:चं साम्राज्य पसरवतात. व्यक्तिपूजेचं स्तोम माजवलं जातं. लोकांना विरक्तीचा उपदेश करून स्वत: महागड्या विदेशी गाड्यांतून फिरणं, परदेशदौरे करणं एवढंच नाही तर बायकांना त्रास देणं इथपर्यंत मजल जाते. मग या देवाच्या दलालांवर श्रद्धा ठेवणाऱ्या भक्तांचं करायचं तरी काय असा प्रश्न येतो. थोडक्यात, श्रद्धेचं बाजारीकरण आणि अंधश्रद्धा यामुळे हा बराचसा गोंधळ आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील सीमारेषा पुसट आहे. एकासाठी जी श्रद्धा आहे तीच दुसऱ्यासाठी अंधश्रद्धा ठरू शकेल.

बुद्धिवादी असले तरी बुद्धीच्या कक्षेला काही मर्यादा आहेत अशी माझी धारणा आहे. एकदा ही मर्यादा मान्य केली की आपलं मन इतरांच्या विचारांप्रती उदार दृष्टिकोन ठेवायला उघडं राहू शकतं. काही गोष्टी 'आज'च्या आपल्या बुद्धीला, विज्ञानाला पटत नसतील, पण कदाचित दोन-तीन पिढ्यांनंतर 'आज' न समजणाऱ्या गोष्टी आपल्या बुद्धीला तेव्हा समजू व पटू शकतील. पृथ्वी 'गोल' आहे हे जेव्हा विज्ञानाला माहीत नव्हतं तेव्हा त्यावर आधारित गोष्टी-घटना समजत नसणारच. कालांतरानंच त्या बुद्धीला पटू लागल्या. थोडक्यात, आपलं अज्ञान एकदा मनापासून मान्य केलं तर इतरांचे विचार, मतं यांच्याबद्दल आदर ठेवण्याची कृती आपण जोपासू शकतो.

श्रद्धा म्हटलं की ओघानं धर्म व देव येतोच. कर्मकांडही येतं. समाजाला चांगलं वागण्यासाठी, नीतिमत्ता शिकवण्यासाठी या गोष्टी उदयाला आल्या असाव्यात. अपप्रवृत्तीचे, दुराग्रही लोक तिथे शिरून त्यात नको ते प्रकार बोकाळले असावेत. धर्मग्रंथांचा, पुराणांचा, वेदांचा आपला अभ्यास नसल्यामुळे त्याविषयी काही बोलण्याचा आपल्याला अधिकार नाही याची मला नम्र जाणीव आहे. पण मग वागायचं कसं, कारण पदोपदी यातल्या कोणत्यातरी बाबीशी गाठ पडतेच. माझ्यासारखाच प्रश्न माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसांना पडत असावा. माझ्यापुरता हा प्रश्न मी आपल्या विवेकाला जे पटेल तसं वागायचं असं ठरवून सोडवला आहे.

माझ्या वडिलांचं मागच्या वर्षी निधन झालं. मी व माझे दोघे मोठे भाऊ यांना वडील फार प्रिय व जवळचे. त्यांचं आजारपण, त्यांची सेवा, हे आम्ही तिघं तीन वेगळ्या शहरांत राहत असून वेळोवेळी एकत्र येऊन केलं. आईची इच्छा म्हणून वर्षश्राद्ध करण्याचं ठरवलं. नेमक्या त्याच तारखेला मला आफ्रिकेला तिथल्या गरीब लोकांच्या डोळ्यांचं ऑपरेशन करण्यासाठी बोलावणं आलं. आता काय करायचं असं खरोखरच धर्मसंकट पडलं. जुन्या वळणाची आसपासची वडीलमंडळी म्हणायला लागली, 'तू गेली नाही तर दुसरं कुणीतरी जाऊन ऑपरेशन्स करू शकतात, पण तुझ्या वडिलांचं वर्षश्राद्ध एकदाच येणार; त्यामुळे तू वर्षश्राद्धाला जाणं योग्य.' मला वाटत होतं वडील तर गेलं पण माझे जे आप्त आहेत म्हणजे भाऊ व आई, त्यांच्या भावना महत्त्वाच्या! धार्मिक कर्मकांडांवर माझा विश्वास नाही पण आप्तजनांना दुखवून काही करणे योग्य नव्हे. आई म्हणाली, 'तू चांगल्या कामासाठी जाणार आहेस. वडील असताना

त्यांच्यासाठी जे करायचे ते तू नीटपणे केलंस. मग आता तू लोकांना दृष्टिदान देणं जास्त महत्त्वाचं.'

भाऊ म्हणाले, 'वडिलांचं सर्व आपण एकत्र येऊन, एकजुटीनं सारं काही केलं. आता वडिलांसाठी आपण तिघं एकत्र येऊ अशी ही शेवटचीच वेळ. यानंतर वडिलांसाठी आपण कधीही एकत्र येणार नाही. त्यामुळे तू आमच्याबरोबर असावीस असं वाटतं.'

धार्मिक कर्मकांडांचं धार्मिक दृष्ट्या महत्त्व काय आहे मला माहीत नाही. त्याचं अवडंबर माजवलं जातं हेही खरंच. पण सर्वजणांनी एकत्र येऊन 'काहीतरी' करणं – असं एक अतिशय महत्त्वाचं प्रयोजन कुटुंबीयांना पुरवलं जातं हे खरं. त्यामुळे सारे एकत्र येऊन, एकमेकांचा सहवास वाढतो. त्यामुळे भावाचं असं म्हणणंही मला महत्त्वाचं वाटलं.

स्वत:चे विचार तपासून पाहिल्यास ऑपरेशन करणं, कर्म करणं मला जास्त योगय वाटत होतं. माझ्या वडिलांनाही तसंच वाटलं असतं याची मला खात्री होती.

पण आमच्यापैकी कुणीही श्राद्ध हा धार्मिक संस्कार महत्त्वाचा आहे म्हणून तू आलं पाहिजेस असं मनात नव्हतं. या निमित्तानं सगळ्यांच्या मनाची व माझ्या स्वत:च्या मनाचीही चाचपणी झाली. 'कर्मा'ला माझ्याकडून जास्त महत्त्व दिलं जातं असं माझ्या लक्षात आलं. योगायोगानं आफ्रिकेच्या तारखा पुढे गेल्यानं धर्मसंकटातून सहीसलामत बाहेर पडता आले.

श्रद्धा म्हणजे तरी काय असा विचार केला. मित्रावर आपली श्रद्धा असते का? मित्रावर विश्वास असतो. मित्रावर श्रद्धा आहे असं आपण म्हणतही नाही, मानतही नाही. श्रद्धा ही विश्वासाच्या पुढची पायरी आहे. आपल्या तर्कशुद्धतेची प्रमाणं तिथे लागू पडत नाहीत. आपली ईश्वरावर श्रद्धा असू शकते. मातापित्यांवर श्रद्धा असू शकते. 'मैत्री' या संकल्पनेवर श्रद्धा असू शकते. आपल्या कामावर आपली 'श्रद्धा' आहे असं कदाचित आपण म्हणणार नाही. कामावर 'निष्ठा' आहे असे म्हणू. म्हणजेच 'श्रद्धा' या संकल्पनेत मानवी वर्तन, तर्क या पलीकडचंही काहीतरी अपेक्षित आहे. काहीतरी आपल्याला न कळणारं तरीही आपल्यासाठी चांगलं असं आहे. बुद्धिनिष्ठतेच्या दृष्टीनं याला सकारात्मक विचार करण्याची एक पद्धत आपण म्हणू शकतो.

कठीण प्रसंगात, एकटं असताना, न पेलणारं संकट कोसळत असताना कुणीतरी प्रचंड शक्तिमान, प्रेमळ, क्षमाशील, सर्व जाणणारी शक्ती आहे. जिला आपण शरण जाऊ शकतो ही संकल्पना फार सुखावह व आश्वासक आहे.

मुलीचं बाळंतपण होतं. डॉक्टरांनी तिला आत नेलं. मनाची प्रचंड घालमेल. तिला एवढ्या वेदना सहन होतील का? एका जीवापासून दुसऱ्या जीवाच्या निर्मितीचा तो क्षण. तो व्यवस्थित पार पडेल का? बाळ जन्मल्यावर रडेल का? निरोगी असायला हवं – असे सर्व विचार मनावर दडपण आणत होते. माझ्या हातात काहीच नव्हतं. मी स्वत: डॉक्टर असल्यामुळे या प्रसंगात काय काय वाईट घडू शकतं याची संपूर्ण माहिती. पर्समध्ये कुणीतरी दिलेलं रामरक्षेचं छोटं पुस्तक होतं. ते उघडलं व निदान डोळे त्यावरून फिरवू लागले. थोडंफार लक्ष दुसरीकडे जायला मदत झाली. घालमेल थोडी का होईना पण कमी झाली. आपल्या हातात काहीच नाही, आपण काहीच करू शकत नाही, यापेक्षा आपण निदान प्रार्थना करू शकतो हा विचार जास्त बरा वाटला. जर थोडीही श्रद्धा नसती, हे सर्व थोतांड आहे अशी मनाची धारणा असती तर मानसिक घालमेल नुसती सहन करण्यावाचून पर्याय नव्हता.

ईश्वराच्या स्वरूपावरून, धर्मावरून माणसा-माणसांमधला तिरस्कार पाहिला, प्रचंड संहार पाहिला, केवळ दुसऱ्या धर्माचे आहेत म्हणून निरपराधांचा जीव जाताना पाहिला की मात्र फक्त आपल्या धर्मावर असलेल्या अतिरेकी श्रद्धेचा राग येतो. माणसा-माणसांमधलं अंतर वाढवणारी ही श्रद्धा आहे. श्रद्धा माणुसकीवर हवी. श्रद्धेनं माणुसकीची वाढ व्हायला हवी. श्रद्धा माणसाची शक्ती वाढवणारी हवी. श्रद्धेमुळे दुर्बलता वाढायला नको. श्रद्धा व बुद्धी या दोन्हीला विवेकाची जोड हवी.

डॉक्टरी भाषेत सांगायचं तर इतर अनेक औषधांसारखं श्रद्धा हे एक औषध आहे. जिच्यामुळे आपल्याला मानसिक स्थैर्य, शांती व बल मिळतं.

त्यामुळे जरी बुद्धिवादी व कर्मवादी असले तरी जीवनातल्या सर्व चांगल्या गोष्टींवर श्रद्धा ठेवण्यावर माझी श्रद्धा आहे.


– डॉ. माधवी मेहेंदळे
प्रकाश डोळ्यांचे हॉस्पिटल,
डेक्कन जिमखाना, पुणे
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com






सारांश शून्य

संजय कळमकर

लेखक संजय कळमकर यांनी मांडलेली, शिक्षणक्षेत्रातील भ्रष्ट व्यवस्थेच्या विरोधात लढण्याचा निश्चय करणाऱ्या तरुणाची ही कथा...चित्रदर्शी-प्रत्ययकारी...

मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.
टपाल खर्च ३० रु

# तृष्णाकाठ


## दीपा देशमुख

काही माणसं भेटतात, बोलतात. मनावर आपला ठसा उमटवतात. त्यांची आणि आपली झालेली ती पहिली भेटही लक्षात राहते. पण काही माणसं न बोलताही खूप आपली होतात. त्यांचा प्रत्येक शब्द, प्रत्येक वेदना, प्रत्येक भावना आपल्यात मिसळून जाते. तसा हा वैभव (वैभव देशमुख)– त्याची आणि माझी पहिली भेट कशी झाली हे मला आज आठवत नाही. पण तो आला आणि मग त्याची कविताही त्याच्याबरोबरच आली. इतकी जवळ आली की तिच्या–माझ्यात कुठलं अंतरच राहिलं नाही. खूप वेळा तर असं होई की मी म्हटलेली वैभवची कविता तो स्वतःही नंतर फारशी म्हणत नसे. जणू काही मी त्या कवितेचं पेटंटच घेतलेलं असे. कधी कधी तर त्याला त्याच्या कवितांमधले शब्द आठवत नसत, पण इतर बाबतीत विसराळू असलेली मी, मला मात्र एका ऐकण्यात त्याची कविता पाठ होऊन जात असे.

वैभवच्या कविता मला सुरुवातीला भेटल्या आणि मग माझ्या सगळ्याच प्रवासात त्या सोबत करत राहिल्या. आजही मला त्या तेवढाचा आनंद देतात. औरंगाबादला असताना – काही दिवस खूप कठीण परीक्षेचेच होते. त्यावेळी अपूर्व, मनोज, मी आणि वैभव दुपारी जे कम्प्युटरसमोर कविता गात बसत असू ते रात्रीचे ११–११.३० कसे वाजत याचं भानही आम्हाला राहत नसे. मग नाइलाजानं घड्याळाचे भराभर पुढे सरकलेले काटे बघून आम्ही खिचडी वगैरे काहीतरी करून खात असू. नंतर वैभवला सोडायला

**तृष्णाकाठ**

**वैभव देशमुख**




**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**

**टपाल खर्च ३० रु**

म्हणून कोपऱ्यापर्यंत जाताना पुन्हा गप्पा रंगत आणि पुन्हा अर्धा–एक तास कसा गेला कळत नसे. खरं तर वैभव फारसा बोलका नाही. पण कविता त्याला बोलकं करत. माझ्या कवितांनाही वैभव चाल लावून देत असे. नंतर नंतर तर आम्ही रोजच भेटू लागलो. एक दिवस मध्ये न भेटता गेला तर आम्हाला चुकल्या–चुकल्यासारखं होई. मात्र काहीच दिवसांत आम्ही सगळेच वेगळे झालो. चार दिशांना चौघं गेलो. मी तर एकदम आदिवासी भागात, जिथं मोबाईल, इंटरनेटचा पत्ताही नव्हता. पण सुटीच्या दिवशी किंवा कामाच्या निमित्तानं मी जेव्हा तालुक्याच्या ठिकाणी येई, त्यावेळी वैभवला आवर्जून फोन करत असे. त्या फोनवर त्याचा आनंद भरला स्वर ऐकून खूप छान वाटे. माझा एकच प्रश्न असे, ''वैभव नवीन कविता केलीस? ऐकव ना.'' आणि तोही लगेच रस्त्यात जिथे कुठे असेल, जोरात आवाज काढून मला कविता ऐकवायचा. गाताना त्याला रस्त्याचं, त्याच्याकडे बघणाऱ्यांचंही भान राहत नसे. त्या कविता मला मग सोबत करत. मी आदिवासी भागातल्या माझ्या कार्यकर्त्यांना त्या ऐकवत असे.

वैभवच्या कवितांचे अनेक कार्यक्रम व्हावेत, त्याच्या कवितांचं पुस्तक निघावं असं आम्हा सगळ्यांनाच वाटत असे. त्याच्याइतकीच किंवा त्याच्यापेक्षाही जास्त तीव्रतेनं आम्ही त्याच्या काव्यसंग्रहाची वाट पाहत होतो. आणि अखेर ग्रंथाली आणि चित्रकार सतीश भावसार यांनी वैभवचं अव्यक्त, अबोल मन 'तृष्णाकाठ'च्या मुखपृष्ठातून बोलकं केलं, सजीव केलं.

वैभवचं 'तृष्णाकाठ' वाचकाचं मनोगत व्यक्त करतं. या माझ्या अडाणी–पणाच्या काचा मनातली खंत, सल व्यक्त करतात. ज्याला वैभव अडाणीपण म्हणतो, त्या प्रामाणिक मनाला या दुटप्पी जगासोबत व्यवहार करणं जमत नाही. तेव्हा ते रक्तबंबाळही होतं. अशा वेळी मात्र ही कविताच आशा तेवत ठेवते. या दुःखाला, वेदनेला दडपून टाकणाऱ्या मनाला म्युट करावं लागणंही तो अस्वस्थ होऊन सांगतो. त्याच्यातलं सृजनत्व, संगीत उफाळून बाहेर

येऊ पाहतं, पण पदोपदी ही व्यवस्था, ही परिस्थिती कशी या आशेला तिलांजली देण्यासाठी सज्ज झाली आहे याचे दाखलेही कवी देतो.

वैभवच्या कविता नेमक्या, अगदी कमी शब्दांत आभाळाएवढ्या भावना व्यक्त करणाऱ्या! 'ही दुनिया असंच उघडत नाही दार' हे सांगताना आजच्या तरुणाईला शॉर्टकटचा जो मार्ग प्यारा वाटतो त्याविषयी ही कविता भाष्य करते. किती अडचणींना सामोरं जावं लागतं, किती संकटांशी झगडावं लागतं आणि किती पराभव पचवावे लागतात, तेव्हा कुठे मन खंबीर होतं आणि रस्त्यावरून पोळलेली पावलंही न थकता चालू लागतात पुढे पुढे...आणि मग तेव्हा कुठे हवं ते गवसण्याची किरणं दिसू लागतात, नजरेच्या जवळपास! प्रतिकूल परिस्थितीतही कवीचा आशावाद जिवंत ठेवतो त्याला. मनातली बाहेर न आलेली कविताही त्याच्या या प्रतिकूल परिस्थितीत त्याच्यासोबत चालत राहते. व्यवहारी जगात त्याचं संवेदनशील मन रोजच आपलं मरण बघत राहतं. चालू जगातली प्रतिभावंतांची प्रतिभा, उगवत्या सूर्याला नमस्कार करणारे आणि सांस्कृतिक बधिरता, कवी व्यंगात्मक रीतीनं मांडतो. वाचकाला तो अंतर्मुख होण्यास भाग पाडतो. कवीसोबतचा प्रवास सोपा आहे, पण सुलभ नाही. त्याची कविता सरळ आहे, पण तिला अनेक कंगोरे आहेत. आजच्या जगाचं, लोकांच्या मानसिकतेचं इतकं चोख विश्लेषण कवी करतो–

तो म्हणतो,

*सगळेच फोनवर बोलताहेत*
*सगळीच गर्दी एकटी आहे.*

*आपण संवेदनाशून्य झालो आहोत, आपलं एक यंत्र झालं आहे हे सांगताना तो म्हणतो,*

*आपण बनलो आहोत वेगवान किडे*
*आपलीच घाण उडवत, बरबटत धावणारे*
*आपल्याला वेळ नाही,*
*रस्त्यातलं शवही आपला स्पीड ब्रेक करू शकत नाही*

*चंगळवाद, प्रदूषण आणि पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या आपल्या सगळ्यांनाच कवी रोखठोक सवाल करतो,*

*आपणच गिळलाय भोवतालचा हिरवा*
*आपणच करतोय वर्तमान काळा*
*आपलं भविष्य कुठल्या रंगाचं असेल?*

जागतिकीकरणाचं वारं गावांपर्यंतही जाऊन पोचलंय. मात्र कवीचं मन त्याच आठवाच्या गावात अडकलंय. पूर्वी गावाला जायला लागलो की... काय काय होत असे याची यादीच कवी करतो. कधीकाळी खरं असलेलं गाव आणि तो गावाला जातानाचा प्रवास हे आता स्वप्नापुरतंच उरलंय. याची खंत कवी, शहरात विसावलेलं यंत्रवत झालेलं मन आपल्यापुढे आणत; 'आताशा मन निघतच नाही या शहरातून...' सांगतो. बदललेलं गाव त्याला नकोसं वाटतं. शहराच्या विळख्यात सापडलेलं असहाय मन वाटत असूनही शहराचे पाश कसं तोडू शकत नाही हे तो सांगताना म्हणतो,

*किती उदास करून जातं गावात आपल्या घराचं नसणं*
*आणि अजूनही वाजतच असते*
*मोबाईलची बेल*
*होताच येत नाही आऊट ऑफ कव्हरेज या शहरापासून...*

या शहराचा कवीला मनापासून राग येतो, पण सुटका तर नाही. हे शहर त्याला लग्नाला देणाऱ्या प्रेयसीसारखंच दिसू लागतं. तो म्हणतो,

*रक्ताची वाफ दिली या शहराच्या उन्हाला*
*गरम लाल वेळांना डोळे दिले तासन्तास*
*कंपन्यांच्या धुराला फुप्फुस दिलं काही काळ*
*पायांची वणवण दिली या साऱ्या रस्त्यांना*

शहरात होणारी सर्वसामान्यांची परवड कवीला व्यथित करून जाते. त्याचे परिणाम तो मांडतो. शहरात येणारं बधीरपण तो मान्य करतो. आपणच आपल्या विनाशाला कारणीभूत कसे असणार आहोत, याविषयी बोलताना तो म्हणतो,

*ही गर्दी चिरडली जाईल,*
*स्वतःच्या पायाखाली...*
*एक उंदीर मरतो तेव्हा हजार उंदीर जन्म घेतात या देशात*

या कवितेतून कवी सर्वसामान्यांचं नाकर्तेपण, अगतिकता, संख्येनं जास्त असूनही स्वीकारलेली लाचारी व्यक्त करतो आणि त्याचबरोबर मूठभरांची अरेरावी, दबाव हेही व्यंगात्मक रीतीनं नमूद करतो. अतिशय मार्मिक आणि सुंदर कविता आहे ही! सुन्न करणारी, अंतर्मुख करणारी!

शहरांनी माणसाच्या मानसिकतेवर केलेलं आक्रमण आणि त्याच्या गोठवलेल्या भावना जागोजाग, पानोपानी बघायला मिळतात. मग तिला सहन होत नाही टीव्हीचा आवाज या कवितेतूनही तेच सत्य तो पुढे आणतो. भूतकाळाला विसरता येत नाही, आणि कटू वर्तमानाला स्वीकारता येत नाही, पण तडजोड करावीच लागणार त्यामुळे अगतिक झालेली चित्रं तो रंगवतो. आईमुलाच्या नात्यातली कोमलताही कवी जपतो. म्हणूनच तो म्हणतो,

*संध्याकाळच्या सातलाच तिच्या मनात दाटून यायचा मध्यरात्रीचा काळोख,*
*अन् मी येताना दिसलो की तिच्या चेहऱ्यावर जणू सकाळ व्हायची!*

'डोळे भरून चांदणे कथा ऐकताना प्यावे' या कवितेत तर कवी बालपणात शिरतो आणि ती भातुकली, ते लुटूपुटूचे खेळ त्याला आठवतात. त्या सगळ्या खोट्या खोट्या खेळातली गंमत तो दाखवतो आणि लिंबोळ्याच्या मांडलेल्या दुकानात रंगीबेरंगी काचेचे पैसे खिशात कसे असायचे हेही मोठ्या कौतुकानं सांगतो. कवीच्या या ओळी म्हणजे तर कहर आहेत, तो म्हणतो,

*पुन्हा एकदा नव्याने सुटी शाळेला मारावी*
*दीस मातीत मळावा, सांज नदीत ढळावी*
*नदीकाठी काजव्यांचे दिवे मोजत बसावे*
*पुन्हा निवांतले क्षण कोणी धरून आणावे*

कवीच्या प्रेमकविता असो वा आईविषयीची तळमळ, या सगळ्या भावनांमागे मात्र गावाचं चित्र स्पष्टपणे उमटत असतं. कष्टकरी हात आपल्याला जाणवतात. परिस्थितीचा झगडा आणि त्यातूनही सौख्याचे चार–दोन क्षण टिपताना कवी दिसतो. कवीच्या सोन्यानं फुलला मळा,

सखे सोन्यानं फुलला मळा यात वाचक शब्दरूपी निसर्गचित्रात रमून जातो. शब्द ओठी आणि चित्र मनःपटलावर रंगायला सुरुवात होते. ही कविता वाचताना संपूच नये असं वाटायला लागतं.

तृष्णाकाठावरचा प्रियकर प्रेयसीचा श्रृंगारही कवी तेवढ्याच नजाकतीनं टिपतो. तिचं असणं काय आहे हे तो अनेकविध प्रतिमांमधून सांगायचा प्रयत्न करतो आणि माझ्या मौनातलं गाणंही आहेस म्हणतो. तिची आणि त्याची पहिली भेट, तिचा झालेला पहिला स्पर्श कसा उत्कट होता आणि त्याच भावनेनं त्यानं तो कसा जपून ठेवलाय याचं वर्णन तो करतो. त्याचबरोबर प्रेयसीच्या विरहानं व्याकूळ झालेला प्रियकरही कवीला दिसतो आणि मग तिच्या आठवणीत घरातली एक न एक वस्तू कशी तिच्या आठवात बुडालेली आहे हे तो गझलच्या माध्यमातून व्यक्त करतो. ताटातूट झालेल्या प्रियकराला तिची आठवण येत राहते आणि मग सायंकाळच्या कातरवेळेला तिची आठवण जास्तच तीव्र होते. तेव्हा तिला तो,


*सांज घराशी घुटमळताना आठवते का काही*
*भवताली कोणी नसताना आठवते का काही*

अशा प्रश्नांचा भडिमार करत, तिला सगळे प्रेमाचे क्षण पुन्हा पुन्हा आठवून देतो. तिला देण्यापेक्षा स्वतःच त्यात गुरफटून घेतो. असह्य वाटणाऱ्या ताटातुटीलाही या प्रियकराला सामोरं जावं लागतं. तेव्हा ही कविताच त्याला सोबत करते. सगळीकडे अंधार दाटला असून तो लालेलाल शब्दांचा आधार घेतो. यातून त्याचं तप्त होणं, जाळत जाणं एकप्रकारची उद्ध्वस्तता त्याच्या ठायी ठायी भिनलेली दिसते. शापित आयुष्यातलं सगळंच वातावरण सुनं सुनं आणि सुस्तावलेलं कवीला दिसू लागतं. भूतकाळात कवीचं मन रमू लागतं. त्या भूतकाळातले सौख्याचे क्षण क्षणभर का होईना त्याला जगता येतात. पण ते आठवायलाही त्याला वेळ नाही. कष्टकऱ्याला आराम कुठला, दिवसभर काबाडकष्ट आणि रात्र दुसऱ्या दिवसाच्या विवंचनेतच अर्धी संपते.

कवीच्या प्रत्येक कवितेमधून निसर्गही त्याच्या प्रत्येक भावनेप्रमाणं त्याला साथ देताना दिसतो. कवीच्या उत्फुल्ल क्षणी त्याचा सोन्यानं पिवळा झालेला मळा असतो तर त्याला झाडांमध्येही माणूस दिसायला लागतो. 'झाडं असतात विद्यार्थी, ऋतू त्यांचे गुरू असतात' ही कविता त्याची साक्ष देते. ही कविता खूपच सुरेख आहे. झाडांची परीक्षा, झाडांचं कंटाळणं, झाडंही कशात मग मन रमवतात, संकटात, वादळवाऱ्यात कसं तग धरून राहतात हे सांगत सांगत कवी म्हणतो की ते मरणाला जवळ स्वतःहून कधीच करत नाहीत. शेवटपर्यंत झुंजत राहतात.

वैभव, तुझ्याकडे प्रतिभेचं वैभव आहे. ते जप असं म्हणणार नाही, तर ते खूप खूप उधळत राहा...भरभरून असंच म्हणेन!

**– दीपा देशमुख**
adipaa@gmail.com




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**
**टपाल खर्च ३० रु**

## तांडव हरवताना...

### रवी परांजपे

भारतीय कलाजीवनांत एक पैलूदार स्वशैलीची भर टाकणारे ज्येष्ठ कलावंत. त्यांना आजपर्यंत अनेक महत्त्वाचे कला पुरस्कार मिळाले आहेत. 'शिखरे रंग-रेषांची' हा सुबोध-सुंदर-भावस्पर्शी पूर्वसुरी चित्रकारांवरील परिचय ग्रंथ (चंद्रकला प्रकाशन, पुणे १९९८) 'ब्रश मायलेज' हे स्व-कलाप्रवासाचे आत्मकथन (राजहंस प्रकाशन, पुणे २००६) आणि 'नील-धवल ध्वजाखाली' (कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे २००६) हे वैचारिक लेख संकलन, अशी पुस्तके त्यांनी आजवर लिहिली आहेत. यापैकी 'ब्रश मायलेज'ला २००६ चा 'भैरू रतन दामाणी साहित्य पुरस्कार' आणि 'नील-धवल ध्वजाखाली'ला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा २००८ चा 'अभिजात' पुरस्कार लाभला आहे.

RNI NO MAHMAR4234/13/1/2013 TC


मराठी ग्रंथविश्वातील अपूर्व घटना!

# आमचा बाप आन् आम्ही नाबाद १,६०,००० प्रती

१६१ वी आवृत्ती!




सानेगुरुजींनी महाराष्ट्राला आदर्श आई दिली आणि नरेंद्र जाधवांनी महाराष्ट्राला दिला आदर्श बाप!
- निळू फुले


घराघराच्या छतावर उभे राहून, साऱ्या जगाला ओरडून ओरडून सांगावेसे वाटते; हे पुस्तक वाचा.
- विजय तेंडुलकर

मराठी भाषेच्या सात-आठशे वर्षांच्या इतिहासातील सर्वोत्तम (ऑल टाइम बेस्ट) अशा पहिल्या पाच ग्रंथांमध्ये मी या पुस्तकाचा समावेश करीन. हे पुस्तक म्हणजे मराठी भाषेचे लेणे आहे.
- वसंत बापट

मूळ किंमत १२० रुपये सवलतीत ८० रुपये
टपालखर्च २० रुपये

## डॉ. नरेंद्र जाधव यांचा विचारसमृद्ध नवा ग्रंथ

'लसावि - माझ्या समग्र अभिव्यक्तीचा' या ग्रंथामध्ये नरेंद्र जाधवांच्या विचारांची झेप, त्यांचे समृद्ध अनुभवविश्व - व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक - त्यांचा लोकसंग्रह आणि त्यांचा झपाटा यांचा 'प्रोमो' वाचायला/पाहायला मिळतो.
- कुमार केतकर




जनआवृत्ती मूळ किंमत ४०० रुपये
सवलतीत ३०० रुपये
टपालखर्च १०० रुपये

डिलक्स आवृत्ती मूळ किंमत ८०० रुपये
सवलतीत ५०० रुपये
टपालखर्च १०० रुपये


मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.